सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियनस्

# तिसरे अधिवेशन

कॉ. बी. टी. रणदिवे

यांचे

अध्यक्षीय भाषण

मुंबई, दि. २[illegible]-२[illegible] मे १९७५

कॉम्रेड्स्,

गेल्या अधिवेशनापासूनच्या काळांत अत्यंत मोलाचे असे कित्येक कॉम्रेड आपल्यामधून कायमचे निघून गेले आहेत.

भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे संस्थापक आणि बंगालमधील कामगार आणि किसान चळवळीचे आद्य प्रवर्तक चिरंतन स्मृतीचे कॉ. **मुझफ्फर अहमद** यांच्या स्मृतीस मी प्रथम वंदन करतो. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कमिटीचे सदस्य आणि किसान सभेचे सरचिटणीस, विख्यात क्रांतिकारक कॉ. **हरेकृष्ण कोनार** यांच्या स्मृतीस मी प्रणाम करतो.

केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे झुंजार नेते आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील पुढारी कॉ. **के. जी. बोस** यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो.

तसेच आपल्या जनरल कौन्सिलचे सभासद, केरळच्या मळे कामगारांचे आवडते पुढारी व आमदार **कॉ. राजन** यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो.

पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये गुंडांच्या अत्याचारांना आमचे शेकडो कॉम्रेड बळी पडले आहेत. कामकरी जनतेचे व कामगारवर्गाचे हे सुपुत्र आपल्या ट्रेड युनियन चळवळीत आणि अन्य लोकशाही चळवळीत मध्यभागी राहून कार्य करीत होते. या वीर हुतात्म्यांच्या स्मृतीस आमचे कोटीकोटी प्रणाम. क्रांतिकारक कामगार कार्यासाठी लढताना प्राणांची आहुती देणाऱ्या कॉ. **रामस्वामींची** आम्हांला या प्रसंगी विशेष आठवण येते.

हे सारे हुतात्मे आले होते कामगारवर्गाच्या पंक्तीतून, विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी, कर्मचारी यांच्या समुदायामधून, लोकशाही आणि समाजवाद यासाठीच लढता लढता ते धारातीर्थी पडले.

राजस्थान, तामिळनाडू, महाराष्ट्र व इतर राज्यांतही कामगारांच्या लढ्यांमध्ये आमचे कित्येक लढवय्ये कामगार आणि कार्यकर्ते मारले गेले आहेत; त्यांना आमचे लाल सलाम.

पश्चिम बंगाल, केरळ आणि इतर राज्यांतील तुरुंगांत आमचे शेकडो कॉम्रेड खितपत पडले आहेत. त्यात ट्रेड युनियन पुढारी आहेत, लोकशाही आणि किसान चळवळीचे पुढारी आहेत, राजकीय नेते आहेत. या सर्वांना आपण भ्रातृभावाचा हार्दिक संदेश पाठवू या.

सर्वच राज्यांत संपलढयांमध्ये शेकडोंची धरपकड झालेली आहे आणि त्यांचा दीर्घकाळ छळ चाललेला आहे. आम्ही त्या सर्वांना आश्वासन देत आहोत कीं तुमचे संघटनात्मक आणि राजकीय नाते कुणाशीही असो, तुम्हाला सोडवण्यासाठी सी. आय. टी. यू. अविश्रांत झटत राहील.

त्यामध्ये सर्वप्रथम आमच्या डोळ्यांसमोर आहेत ते जन्मठेपेची शिक्षा झालेले आमचे कोटयाचे कॉम्रेड, त्यांना न्याय मिळून त्यांची सुटका होईपर्यंत आम्ही क्षणाचीही उसंत घेणार नाही.

पश्चिम बंगालमध्ये बर्दवान आणि २४–परगणे येथील आमच्या लढवय्या ट्रेड युनियन आणि किसान कॉम्रेडसना ज्या रानटी शिक्षा ठोठावण्यांत आल्या आहेत त्यांचा आम्ही धिक्कार करतो. नुकतीच तीस कॉम्रेडना जन्मठेपेची शिक्षा झाली असून बर्दवानचे कॉ. **मनोज पॉल** यांना फाशीची सजा झाली आहे.

कॉम्रेडस, आपणां सर्वातर्फे **व्हिएतनाम** आणि **कंबोडीयाच्या शूर जनतेला** मी अत्यंत **हार्दिक अभिवादन** करतो. अमेरिकन सामाज्यशाहीविरुद्ध त्यांनी मिळविलेले भव्य विजय एक नव्या युगाची ललकारी देत आहेत. व्हिएतनामचे लोकशाही प्रजाराज्य, दक्षिण व्हिएतनामचे अस्थायी क्रांतीकारी सरकार आणि व्हिएतनाम व कंबोडीया या उभय देशांचे राष्ट्रीय मुक्तिमोर्चे यांनी जगांतील साऱ्या जनतेच्या त्या कट्टर शत्रूचा दारुण पराभव करून आशियाई मानवतेचीच लढाई जिंकली आहे.

कॉम्रेडस्, इंडोचीनी जनतेच्या या दोन ऐतिहासिक विजयांनी जगांतील समग्र लढाऊ जनतेचा आत्मविश्वास शतपटीने वृद्धिगत होईल. त्यांचे हे विजय साऱ्या जगांतील जनतेला प्रगतिपथावर पुढे नेणारे विजय आहेत. अमेरिकन साम्राज्यशाहीचा अंतिम पाडाव करण्याचा मार्ग खुला करून दिल्याबद्दल भावी पिढया ह्या दोन जनतांच्या सदैव ऋणी रहातील.

संख्या लहान, शस्त्रसामग्री अत्यल्प आणि परिस्थिति मागासलेली अशा प्रतिकूल स्थितीतल्या जनतेने संहाराच्या अद्ययावत् अस्त्रांनी सुसज्ज असलेल्या वडया जागतिक सत्तेचा असा सपशेल धुव्वा उडवावा या गोष्टीला जगाच्या इतिहासांत तोड नाही. इतिहासांत पूर्वी असे घडले नसेल. पण ही गोष्ट हेच **दर्शविते की सध्याचे युग हे जगाच्या इतिहासात नवे पर्व सुरू करणारे आहे** साम्राज्यशाहीचे अंतिम उच्चाटन आणि समाजसत्तावादाचा विजय यांचे **दर्शन** हेच युग घडवणार **आहे**.

कॉम्रेडस, व्हिएतनाम आणि कंबोडीयाच्या जनतेने विजयश्री हस्तगत केली ती स्वतःचे रक्त सांडून, कल्पनातीत त्याग करून, स्वातंत्र्याप्रीत्यर्थ सर्वस्वाची राखरांगोळी करण्याची तयारी दाखवून. विजयश्री त्यांनी खेचून आणली ती समोरसमोर लढाई देऊन.

यावरून पुन्हा एकवार स्पष्ट होते आहे की बड्या राष्टांतील तणातणी निवळो न निवळो, अमेरिकन सामाज्यशाही आपले खुनी उद्दिष्ट कदापि विसरत नसते, आणि लढणारी जनता शत्रूचा शस्त्रबळाने पराभव करीत नाही तोपर्यंत ती विजयी होत नसते.

व्हिएतनाम–कंबोडीयाच्या जनतेचा विजय हा आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचा व जागतिक जनतेचा विजय आहे. व्हिएतनामच्या लढ्याला समाजवादी देशांची मदत लाभली, कंबोडियाच्या जनतेच्या लढ्यालाही समाजवादी देशांची, विशेषतः जनतेच्या चीनची मदत लाभली आणि अमेरिकन शस्त्रबळाचा धुव्वा उडवण्यात ह्या मदतीने मोलाचा वाटा उचलला.

दुसरी गोष्ट म्हणजे जगभरच्या कामगारवर्गाने या लढ्यांना राजकीय आणि नैतिक पाठिंबा दिला आणि युद्ध चालू ठेवण्यास विरोध असणाऱ्या लोकशाही शक्तींकडून खुद्द अमेरिकेतही हा पाठिंबा मिळाला. ह्या गोष्टींनीही ह्या विजयाला महत्त्वाचा हातभार लावला.

कॉम्रेडस्, या प्रसंगी आपण नव पोर्तुगालचा उदयही विसरता कामा नये. नवोदित पोर्तुगालने फॅसिस्ट हुकुमशाही झुगारून दिली आणि लोकशाही राजवट प्रस्थापित केली. सत्तासंक्रमणाच्या काळात अपरिहार्य असलेली गुंतागुंत लवकरच दूर होईल आणि पोर्तुगालची जनता लोकशाही टिकवून आणि वाढवून प्रगतीपथावर नेटाने आगेकूच करील असा आम्हाला विश्वास आहे.

कॉम्रेडस्, याबरोबर सोविएत युनियन, जनतेचा चीन आणि इतर समाज-सत्तावादी देश येथील कामगारांना आणि जनतेला आपण भ्रातृभावाच्या अभि-वादनाचा हार्दिक संदेश पाठवया. अमेरिका, इंग्लड, इटली, फ्रान्स आणि जपान येथले कामगार आज भांडवलदारी अरिष्टाने लादलेल्या ओझ्यांविरुद्ध लढत आहेत. त्यांनाही आपण भ्रातृभावाने अभिवादन करू या.

चिली आणि इंडोनेशियाचे कामगार आणि जनता आज फॅसिझमला बळी पडले आहेत. त्यांच्याबद्दल आपण हार्दिक सहानुभूति आणि बंधुभाव व्यक्त करूया. अरब राष्ट्रांची जनता इस्रायली सामाज्यवाद्यांशी टक्कर देत आहे. तिला आणि पॅलेस्टाइनच्या स्वातंत्र्यासाठी झुंजणाऱ्या शूर योध्यांना आपण बंधुभावाचा संदेश पाठवू या.

पाकिस्तान आणि बंगलादेशमधील परिस्थितीबद्दल आम्हाला विशेष चिंता वाटणे स्वाभाविक आहे. आमच्या शेजारच्या या दोन देशांतील कामगार आणि लोकशाही चळवळीबद्दल आम्हाला जिव्हाळा असणे साहजिक आहे. पाकिस्तान-मध्ये अमेरिकन सामाज्यशाहीने राज्यकर्त्या वर्गाला शस्त्रास्त्रे देण्यास पुन्हा आरंभ केला आहे. त्यांचा सरळ परिणाम म्हणजे त्या देशांतील लोकशाही चळवळीवर आणि बलुचिस्तान, सरहद्द प्रांत येथील जनतेच्या चळवळीवर होत असलेली क्रूर दडपशाही. पाकिस्तानच्या कामगारवर्गाला दडपून ठेवण्यात आले आहे. त्याच्याशी आणि पाकिस्तानच्या लोकशाही चळवळीशी आपण आपला बंधुभाव व्यक्त करू या. अमेरिकन साम्राज्यशाहीने या उपखंडाच्या कारभारांत ढवळाढवळ करूं नये, आणि आशियावासियांना आपापसांत झुंजवण्याचे तिचे धोरण येथे चालू नये याकडे लक्ष देणे हे या तीन देशांतील कामगारवर्गाचे समान कार्य आहे. पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करण्यामागे उद्देश आहे तो अमेरिकन धोरणामागे भारताला ओढण्यासाठी दडपण आणण्याचा. शिवाय पाकिस्तानमधले युद्धखोर आणि भुत्तो यांना देशांतील प्रश्नांवरून लोकांचे लक्ष बाजूला न्यायला व लोकशाही चिरडून टाकायला मदत व्हावी हाही त्यामागचा हेतू आहे.

कॉम्रेडस्, बंगलादेशमधील घटनादेखील तितक्याच धोक्याच्या आहेत. शेख मुजीबुर रहमान यांनी अंमलात आणलेली एकपक्षीय पद्धती जनतेच्या लोकशाही आशाआकांक्षांवर सरळसरळ हल्ला चढविणारी आहे व एकतंत्रीय राजवटीचा पाया घालणारी आहे. यामुळे बंगला देशच्या जनतेचा विश्वासघात झाला आहे. तिला समाजवाद व लोकशाहीचे ध्येय गाठण्यासाठी नवीननवीन कसोटयांना तोंड द्यावे लागणार आहे व अजूनही अग्नीदिव्यांतून मार्ग काढावा लागणार आहे. बंगलादेशमध्ये प्रतिगामी शक्तींनी डोके वर काढले आहे यात शंका नाही. या शक्तींनी आव्हानात्मक पवित्रा घेतला आहे. सामाज्यवाद्यांच्या बाजूच्या या शक्तींचा पाडाव करण्यासाठी जनतेला विश्वासात घेऊन लढ्यासाठी संघटीत करणे आवश्यक होते. परंतु भ्रष्ट नोकरशहा व भांडवलदार यांच्यावर अवलंबून राहिल्यामुळे शेख मुजिबुर रहमान यांना जनता व लोकशाही यांवर हल्ला चढविणे भाग पडले आहे. हे अपरिहार्य होते कारण जनतेचे स्वातंत्र्य दडपल्यावाचून आर्थिक अरिष्टाने उपस्थित केलेले प्रश्न सोडविणे सत्ताधारी भांडवलदारवर्गाला शक्यच नसते.

अविकसित देशांतील भांडवलदार–जमीनदार वर्ग संसदीय लोकशाही टिकवून धरू शकत नाही इतकेच काय, पण विरोधी पक्षांना औपचारिक स्वातंत्र्य देणे व दिखाऊ लोकशाहीचा बचाव करणे हेही त्यांना जमत नाही ही गोष्ट

या तीन देशांतील घटना दाखवून देत आहेत. भारतातही याच दिशेने वाटचाल चालू आहे व म्हणून मुजीबुर रहमान यांनी हुकुमशाही सत्तेची सूत्रे हातांत घेतल्यानंतर इंदिरा गांधी यांनी त्यांचे अभिनंदन करावे यात काही आश्चर्य नाही.

या घटना व त्याचबरोबर या उपखंडातील अमेरिकेचा वाढता हस्तक्षेप या दोहोंची कामगारवर्गाने नोंद घेणे आवश्यक आहे. जनतेची लोकशाही व देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येण्याची ही लक्षणे आहेत. विशेषतः दियेगो गार्सिया येथे तळ बांधून हिंदी महासागरी प्रदेश अमेरिकन नियंत्रणाखाली आणण्याचा अमेरिकन सत्ताधाऱ्यांचा डाव अत्यंत धोकेबाज आहे. त्याचबरोबर इराणला अनिर्बंधपणे शस्त्रांचा प्रचंड पुरवठा करण्यात येत आहे व त्यातूनही अमेरिकेचा डाव स्पष्ट होत आहे. जर कामगारवर्गाने जनतेला या धोक्याचा इशारा दिला नाही व ह्याचा मुकाबला केला नाही तर आपले कर्तव्य बजाविण्यात तो अपयशी ठरेल.

अमेरिकन हेरखाते सी. आय्. ए. च्यामार्फत कशा रितीने खून घडवून आणते, लोकशाही राजवटी उलथवून टाकण्यासाठी देशद्रोह्यांचा कसा उपयोग करून घेते व देशांना गुलामगिरीच्या मगरमिठीत कसे पकडते या गोष्टी नुकत्याच उजेडात आलेल्या घटनांच्या अनुरोधाने स्पष्ट झाल्या आहेत. अमेरिकन एजंटांच्या या कारवाया आपल्या देशात बेबंदपणे चालू आहेत. इंदिरा गांधींचे सरकार सी. आय्. ए. चा उल्लेख फक्त राजकीय फायद्याकरिता करीत असते. परंतु त्याविरुद्ध परिणामकारक पावले उचलीत नाही.

कॉम्रेडस्, आपल्या युनियन्सना त्या धोक्याची कितपत जाणीव झाली आहे व कामगारांना त्याविरुद्ध उठवण्याच्या कामी त्या कितीशा क्रियाशील आहेत हा प्रश्न विचारणे अप्रस्तुत होणार नाही. आपण अमेरिकन साम्राज्यशाहीला सर्व जनतेचा आणि जागतिक कामगारवर्गाचा समान शत्रु समजतो. आज आपला देश आर्थिक अरिष्टाच्या भोवऱ्यात सापडला आहे, आणि सरकारच्या जमीनदारधार्जिण्या धोरणांमुळे आपल्याला पीएल ४८० खाली परदेशांतून धान्य आयात करावे लागत आहे. अशा वेळी अमेरिकन कारवायांचा आणि दडपणाचा धोका अतोनात वाढला आहे. जर त्याविरुद्ध देशाला जागृत करण्यांत आपल्या युनियन्सनी आणि कामगारवर्गाने पुढाकार घेतला नाही, तर दुसरे कोणीच ते करणार नाहीत. ज्या ज्या देशांत साम्राज्यशाहीविरोधी लढा यशस्वीरीत्या लढवला जात आहे त्या त्या देशात त्याचा पुढाकार कामगारवर्गानेच घेतलेला आहे.

आपल्या देशांतील कित्येक केन्द्रीय ट्रेड युनियन संघटना हा वाढता धोका नजरेआड करतात. उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांची तळी उचलणारे आयटकचे पुढारी (बड्या राष्ट्रांतील) तणाव कमी करण्याच्या धोरणाचे गोडवे गात आहेत आणि शांतता-

पूर्ण संबंधांचे नवे युग सुरु झाले असल्याचा हवाला देत आहेत. अशा स्थितीत आपण जर ढिलाई दाखवली तर तो अक्षम्य गुन्हा होईल.

कॉम्रेडस्, आपल्यासमोर आज जी आर्थिक आणि ट्रेड युनियन विषयक परिस्थिति आहे तिचा परामर्श घेण्यापूर्वी तुमचे लक्ष मला सध्यांच्या भयावह राजकीय परिस्थितीकडे वेधायचे आहे. या ना त्या निमित्ताने आणिबाणी चालूच ठेवण्यांत येत आहे (सध्या नवे निमित्त आहे पाकिस्तानला शस्त्रपुरवठा व दिएगो गार्शिया बेटातल्या अमेरिकन कारवाया). घटनेने दिलेल्या अधिकारांचा अगदी बेशरमपणे दुरुपयोग होत आहे. ट्रेड युनियन आणि लोकशाही चळवळीविरुद्ध सशस्त्र गुंड टोळक्यांचा वापर होत आहे. प. बंगालमध्ये विधानसभेच्या गेल्या निवडणुका पूर्णपणे दहशतीच्या अमलाखाली बनावट करून घेण्यांत आल्या––या सर्व गोष्टी स्पष्ट दर्शवतात की हिंदुस्थानात एक-पक्षीय हुकुमशाही स्थापण्याचा सत्ताधारी पक्षाचा निश्चय आहे. हुकुमशाही अधिकार स्वतःच्या हाती घेतल्याबद्दल मुजिबुर रहमान यांचे इंदिरा गांधींनी अभिनंदन केले हा योगायोग नाही.

आपल्या सीआयटीयूने हा धोका पूर्वीच ओळखला होता, परंतु इतर अनेक केन्द्रीय ट्रेड युनियन संघटना आणि राजकीय पक्ष यांना अलीकडेपर्यंत तो उमगला नव्हता. गुजरातमधील चळवळीवर आणि त्यानंतर जयप्रकाशांच्या नेतृत्वाखालील बिहार आंदोलनावर जी क्रूर दडपशाही झाली, तसेच अलिकडच्या कांही पोटनिवडणुकांत दहशत आणि लांडयालबाडया यांचा जो वापर झाला त्यामुळे कित्येक पक्षांना आता एकपक्षीय हुकुमशाहीचा धोका जाणवूं लागला आहे.

ट्रेड युनियन चळवळीच्या संदर्भात पुढे दाखवून दिल्याप्रमाणे त्या संकटाचे सावट एव्हानाच पसरलेले आहे. जोपर्यंत कामगारवर्ग त्याविरुद्ध लढण्यात पुढाकार घेत नाही आणि इतर विभागांना त्यासाठी एकत्र आणत नाही तोपर्यंत ह्या संकटाचा मुकाबला होऊं शकत नाही. सर्वच देशांचा अनुभव आहे की कामगारवर्गाने लढयांत पुढारीपण केल्याखेरीज लोकशाहीचा बचाव होत नाही. आणि तो होत नाही तोवर भांडवलशाहीचा अंत करून सत्ता हाती घेण्याचा आणि समाजसत्तावाद आणण्याची आशाच करता येत नाही. भारतांत पक्षीय हुकुमशाहीच्या वाटचालीविरुद्ध कामगारवर्ग लढयात उतरला नाही तर त्याच्या नशिबी गुलामगिरीच राहील. आर्थिक मागण्यांसाठी, अन्नासाठी, भाववाढीच्या विरुद्ध आणि ट्रेड युनियन हक्कांवरील आक्रमणाविरुद्ध आपल्या सीआयटीयूच्या युनियन्स लढत आहेत. पण तो लढा चालवत असतानाच त्यांनी कॉंग्रेस राजवटीविरुद्ध सर्व लोकशाही शक्तींना एकत्र आणण्यासाठी अविरत झटले पाहिजे. ह्या शक्तींत सर्वात महत्वाच्या शक्ती म्हणजे शेतकरी आणि शेतमजूर. आपल्या युनियन्सनी

सर्व लोकशाहीवादी आणि डाव्या शक्तींना कॉंग्रेस राज्याच्या चढाईविरुद्ध एक करण्यासाठी अविश्रांत प्रयत्न केले पाहिजेत. संघटित ट्रेड युनियन चळवळ त्या कार्याकडे दुर्लक्ष करील तर ती विनाशच ओढवून घेईल. जर तिला शेतकरी आणि शेतमजूर ह्या सामर्थ्यवान दोस्तांचा पाठिंबा नसेल तर ती स्वतःचेच रक्षण करू शकणार नाही.

कॉम्रेडस्, सध्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे आज ट्रेड युनियन्सना सामान्य जनतेच्या हिताचे पाठिराखे म्हणून पुढे येणे शक्य झाले आहे. रेशनिंग व्यवस्थेची वाताहत, अन्नाची टंचाई व बेसुमार भाववाढ, याचा सर्वच विभागांवर परिणाम होत आहे आणि त्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा करणे कामगारवर्गात सहज शक्य आहे. आपल्या लढ्यांनी भिन्न भिन्न विभाग एका छत्राखाली येऊ शकतात. त्यांत कामगार, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, शेतमजूर इत्यादी सर्वांचा समावेश होऊ शकतो. कसणाऱ्याला जमीन आणि शेतकऱ्यांच्या इतर मागण्या आपण उचलून धरल्या तर इतर विभागही आकर्षित होतील. कारण लवकरच सर्वांच्या लक्षात येईल की जमीनदारशाहीचे उच्चाटन करून कसणाऱ्याला जमीन दिल्याने औद्योगिक मालाची बाजारपेठ वाढेल आणि अरिष्टावर मात करता येईल. आणि सध्याच्या भयानक आर्थिक परिस्थितीत परदेशी मक्तेदार कंपन्या ताब्यात घेतल्या पाहिजेत ह्या आपल्या मागणीला देखील राष्ट्रीय विमोचनाचा उपाय म्हणून नक्कीच मान्यता मिळेल.

कॉम्रेडस, वर्तमानकाळावर भर देत असतांना, आपली जी मूलभूत उद्दिष्टे आहेत, भांडवलदार–जमीनदारी प्रथेचा अंत करून समाजसत्तावादी प्रस्थापना करण्याचे जे सर्वोच्च उद्दिष्ट आहे त्यावरच्या आपल्या निष्ठेचा आणि श्रद्धेचा आपण पुनरुच्चार केला पाहिजे. आपल्याला आजच्या लोकशाहीचा विस्तार जनतेच्या लोकशाहीत करून हवा आहे. आपण राज्यसत्तेसाठी लढतो, आपण शोषणाचा अंत करण्यासाठी आणि समाजवाद आणण्यासाठी लढतो. जोपर्यंत राज्यसत्ता कामगारवर्गाच्या आणि त्याच्या दोस्तांच्या हाती नाही आणि जोपर्यंत उत्पादनाची, वाटपाची आणि देवघेवीची सर्व साधने समाजाच्या मालकीची झाली नाहीत, जोपर्यंत उत्पादन साधनांची खाजगी मालकी नष्ट होत नाही तोपर्यंत आपल्या दृष्टीने समाजसत्तावाद अस्तित्वांत असूच शकत नाही. ते होत नाही तोपर्यंत आपल्या दारिद्र्याचा आणि पिळवणुकीचा अंत होणार नाही. आपले हे स्फूर्तिदायी ध्येय जर आपण दृष्टिआड होऊ दिले तर मग आपल्या साऱ्या हालअपेष्टा, आपले कष्ट, आपला तुरुंगवास आणि छळ, आपले हौतात्म्य, कशाचाही कांही उपयोग होणार नाही.

कॉम्रेडस्, आपल्या देशातील आर्थिक परिस्थिती व प्रगत देशातील अरिष्टाची परिस्थिती या दोहोंची वाटचाल एकाच दिशेने होत आहे. दोहोंची वैशिष्टये व लक्षणें जवळजवळ एकच आहेत.

गेल्या तीन वर्षांच्या काळात, विशेषत: गेल्या वर्षी, कामगारवर्गाला पुन्हापुन्हा आर्थिक हल्ल्यांना, दडपशाहीला व अत्याचारांना तोंड द्यावे लागले आहे. ट्रेड युनियन हक्कांवर आक्रमण, पगार गोठवणुकीचा कायदा, ले–ऑफ, कारखाने बंद ठेवणे या साऱ्या गोष्टी म्हणजे अरिष्टाचा बोजा कामगारवर्गाच्या शिरावर सुपूर्द करण्यासाठी वापरलेली साधने होती.

या लढयात अपूर्व एकजूट घडून आली. एकजुटीने प्रतिकार करताना नवे नवे टप्पे गाठण्यात आले. त्याचबरोबर सत्ताधारी वर्गांनी घेतलेल्या वैचारिक व आर्थिक चढाईच्या धोरणाचे नीट आकलन न झाल्यामुळे संघटनेमध्ये काही उणीवा राहिल्या. **पिळणारे वर्ग चौफेर वर्गीय हल्ला चढवीत आहेत** हे या चढाईचे स्वरुप आपल्या लक्षात आले नाही व या लढयातील प्रत्येक प्रसंग आणि पाऊल म्हणजे काँग्रेस सरकारने स्वीकारलेल्या मुख्य वर्गीय धोरणाविरुद्धची एकेक लढाई होती हे आपल्याला समजले नाही. **प्रत्येक प्रश्न जसजसा उद्‌भवला तसतशी आपण त्याविरुद्ध झुंज दिली.** परंतु मूलभूत धोरणाविरुद्धच्या लढाईच्या कालखंडात आपण प्रवेश करीत आहोत याची पूर्ण जाणीव आपल्याला नव्हती. काही अंशी याच्यामुळे सुधारणावादी व दुरुस्तीवादी पुढारीपणाला वरचेवर गोंधळ निर्माण करता आला. सरकारी धोरणावर केलेल्या टीकेला विरोध करता आला, इंदिरा गांधींच्या वतीने वकिली करता आली व सर्व जबाबदारी फक्त नोकरशाहीवर ढकलून देता आली.

### अरिष्टाची लक्षणे

जगभरच्या भांडवलदारी अरिष्टाची लक्षणेच भारतातहि आढळून येतात. वस्तूंच्या किंमतीत सतत वाढ होत असल्यामुळे चलनवाढीची परिस्थिती चालूच आहे. बेकारी भरमसाट प्रमाणावर वाढत आहे; उद्योगधंद्यांमध्ये उत्पादन सतत घसरत चालले आहे आणि कामगारांच्या व कष्टकऱ्यांच्या पगारात व मिळकतीत सतत काट करण्यात येत आहे. सरकारी धोरणांमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या भांडवल व संपत्ती याचे सतत केंद्रीकरण होत आहे. आणखीहि एक फरक होत आहे. ग्रामीण जनता जमीनदारी संबंध व भांडवलदारी बाजारपेठ या दुहेरी जोखडाखाली भरडून निघत आहे व संपूर्णपणे कफल्लक बनत आहे. किंमती सारख्या चढत आहेत आणि मध्येच एखादी लहानशी वाढ सोडल्यास उत्पादनाचा गाडा

रुतून बसला आहे. हे गेली काही वर्षे आपल्या देशामधील भांडवलदारी मार्गाचे कायमचे लक्षण होऊन बसले आहे.

आपल्या जीवनमानावर व नोकरीच्या शाश्वतीवर याचा फार विपरीत परिणाम होत आहे. एवढ्यावरच ही कहाणी संपत नाही. नजिकच्या भविष्यकाळात होणारे याहीपेक्षा मोठे हल्ले व मोठ्या कसोट्या यांचीच ही दुश्चिन्हे आहेत. पगार गोठवणुकीपासून अर्थसंकल्पापर्यंत आणि पतीवरील अंकुशापासून करवाढीपर्यंत जो जो उपाय सरकार योजीत आहे तो प्रत्येक उपाय कामगारवर्गावर व जनतेवर अरिष्टाचा बोजा लादण्याचाच उपाय आहे. पिळवणूक करणारे सर्वात वरचे विभाग, श्रीमंत मालक व जमिनदार यांच्याशिवाय कोणीहि यातून सुटू शकत नाही. मक्तेदार व भांडवलदार यांना अधिक नफेबाजी करता यावी म्हणून अरिष्टाचा हा बोजा कामगार, कर्मचारी, वकील, डॉक्टर्स, इंजिनियर्स, शेतकरी, शेतमजूर, दुकानदार, छोटे उत्पादक व लहान कारखानदार या सर्वांना स्वीकारणे भाग पडत आहे. कामगारांच्या नोकऱ्यांवर कशा तऱ्हेने हल्ले होत आहेत याची जाणीव संघटित ट्रेड युनियन चळवळीला अद्याप झालेली नाही. या ना त्या निमित्ताने हजारो कामगारांना घरी पाठविण्यात येत आहे. असे होण्याचे कारण बेसुमार वाढलेल्या किंमतीमुळे मालाची मागणी कमी होत आहे; त्याचवेळी किंमती उतरण्याचे मात्र कसलेच चिन्ह दिसत नाही.

इंदिरा गांधी रोज देशाला सांगत असतात की मंदीची कसलीच लक्षणे नाहीत आणि त्याच वेळी मालाच्या मागणीत मंदी आली आहे म्हणून हजारो कामगारांची कमाई बुडत आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्यापासून कापडाच्या गिरण्यांत तसेच यंत्रमाग आणि हातमाग धंद्यात कारखाने तात्पुरते बंद ठेवण्याचा किंवा कामगारांना पाळ्या देण्याचा सपाटा चालू आहे. संघटित कापडधंद्यातील खरी परिस्थिती पार उघडी पडली असती, परंतु काही केंद्रात वीज–कपात झाल्यामुळे तो प्रसंग टळला. ही कपात नसती तर मालकांना मागणीच्या अभावी सार्वत्रिक ले–ऑफ देणे भाग झाले असते.

ऑक्टोबर महिन्यात अहमदाबादच्या गिरण्यात रात्रपाळी बंद केली व ५००० कामगारांना बेकार केले. त्याच सुमारास मद्रासच्या बकिंगहॅम–कर्नाटक मिलने आपल्या उत्पादनांत २५% कपात जाहीर केली. अहमदाबादमध्ये रात्रपाळी दोन महिने बंद राहिली. किंमती ३५ ते ४०% कमी करून साचलेला माल खपेपर्यंत ती सुरू झाली नव्हती.

नमूद करण्याजोगी गोष्ट ही की याच्या काही महिनेच अगोदर सरकारने गिरणी मालकांना कापडाच्या किंमती ४० टक्क्यांनी वाढविण्यास मुभा दिली होती व त्याचबरोबर कामगार–कर्मचाऱ्यांच्या वेतनावर त्यांनी हल्ला चढविला होता.

५ नोव्हेंबरच्या पश्चिम बंगालच्या वृत्तपत्रात बातम्या आहेत की त्या राज्यातील संघटीत व असंघटीत उद्योगांमध्ये, विशेषतः कापड गिरण्यांमध्ये पाळ्या देण्याची व कामगारकपात करण्याची सुरवात झालेली आहे. कापड गिरण्यात कामगार मोठ्या संख्येने बेकार बनले आहेत.

नदिया आणि इतर काही जिल्ह्यात यंत्रमागाचा उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. तेथे यंत्रमागाचे कित्येक कारखाने तात्पुरते किंवा कायमचे बंद झालेले आहेत आणि हजारो कामगार नोकरीला मुकलेले आहेत. पतीवरील नियंत्रणाचा फटका लहान उत्पादकांना बसतो आणि त्यामुळे मोठे साठे ठेवण्याची किंवा उत्पादन चालू ठेवण्याची त्यांची ताकद खच्ची होते. याच महिन्यात इचलकरंजी या महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योगकेंद्रात, १५००० यंत्रमाग कामगारांपैकी साधारणतः ४५ टक्के कामगारांना पाळ्या देण्यात आल्या होत्या. यंत्रमाग कापडाचे उत्पादन त्या उद्योगातील अरिष्टामुळे अगोदरच ४० टक्क्यांनी घसरले होते. ते सतत उतरत्या किंमतीमुळे आणि खप कमी झाल्यामुळें आणखी १० टक्क्यांनी कापण्यात आले.

हातमागाच्या कापडाचे मोठे साठे पडून राहिले आहेत अशा बातम्या कित्येक केंद्रांमधून नोव्हेंबर महिन्यात आल्या होत्या. केरळमध्ये शेकडो हातमाग कामगार बेकार बनले होते. आंध्रमध्ये मार्च महिन्यात १७ कोटी रुपयांचा हातमाग कापडाचा साठा पडून असल्याची बातमी होती. यंत्रमागातील हे अरिष्ट आजहि चालूच आहे. एप्रिल महिन्यात भिवंडी या मुंबईनजीकच्या सर्वात मोठ्या यंत्रमाग केंद्रात तीन पाळ्यांऐवजी फक्त एकच पाळी चालू होती आणि तरीसुद्धा मालक आपला माल विकू शकत नव्हते. माल संपेपर्यंत सर्वच पाळ्या बंद ठेवण्याचा त्यांचा विचार चालला होता. याचा अर्थ हजारो कामगार बेकार होण्याचा संभव होता.

बेसुमार भाववाढ, दुष्काळ आणि भेसूर दारिद्र्य हे सारे पाहता शहरांतील तसेच खेड्यांतील जनता पुरेसे कापड विकत घेऊ शकत नाही यांत मुळीच आश्चर्य नाही. देशांतले तीन-चतुर्थांश लोक उघडे फिरत असताना कापड खपत नाही ही ओरड किती विचित्र वाटते !

'चलन-वृद्धी'स आळा घालण्याचा एक उपाय म्हणून सरकारने रेल्वे वाघिणी खरेदी करण्याच्या रकमेत काट केली खरी, पण त्याने शेकडो लोकांच्या नोकऱ्यांवर संक्रांत आली आहे. ह्या खरेदीत कपात झाल्याने या क्षेत्रांतील लहान कारखाने

बंद पडतील आणि मोठ्या कारखान्यांच्या उत्पादनांत क्षमतेच्या २५ टक्क्याएवढी घट होईल अशी भीती आहे. याचाच अर्थ हा की, वाघिणींच्या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर ले–ऑफ दिला जाईल.

पश्चिम बंगालमध्ये सरकारच्या नव्या जकात हुकुमाचा ५०,००० बिडी कामगारांना फटका बसला आहे, तर अमेरिकेची निर्यात एकाएकी घसरल्यामुळे उत्तर प्रदेशमधील मोरादाबादच्या ५०,००० पितळ कारागिरांच्या तोंडचा घास चालला आहे. छोटे कारखाने बंद पडले आहेत आणि बहुतेक कामगार रिक्शा ओढण्याच्या धंद्याला लागले आहेत. त्यातच वीज–टंचाईपायी ले–ऑफवर जाणाऱ्या हजारोंची भर घाला. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडु, पश्चिम बंगाल ह्या राज्यांत वीज–नियंत्रणापायी कमाईचा मोठा हिस्सा गमावलेल्या कामगारांची संख्या लाखांत मोजावी लागेल. ही वीजेची टंचाई केवळ नैसर्गिक आपत्तींमुळे ओढवलेली नाही. तिला कारणे आहेत नोकरशाहीतला भ्रष्टाचार, योग्य मेन्टेनन्सचा अभाव, वगैरे. भ्रष्टाचार हा भांडवलदारी नोकरशाही ढाच्याचाच एक अविभाज्य भाग होऊन बसला आहे.

परिस्थिती दिवसेंदिवस अधिक बिघडत चालली आहे. मार्च अखेरपर्यंत प. बंगालमध्ये रोज सरासरी १०,००० कामगारांना पाळ्या लागत होत्या. बऱ्याच कारखान्यांनी सध्याच्या कायद्यानुसार सरकारला कळवून टाकले आहे की, त्यांना मोठ्या प्रमाणावर नोकरकपात करणे भाग आहे.

इतर धंद्यांच्या मानाने इंजिनियरिंग आणि कापड धंद्यांवर जास्त परिणाम झाला आहे. हिंद मोटर्स आतापर्यंत रोज ४००० कामगारांना पाळीपाळीने घरी पाठवित होती. आता तेथे ५००० कामगार कमी करण्याचा विचार चालू आहे. याचा दुय्यम सहाय्यक कारखान्यांवर परिणाम होणे साहजिक आहे. हिंद मोटर्सच्या ऑर्डरीवर अवलंबून असलेल्या अशा अनेक दुय्यम कारखान्यांत लांब मुदतीचा ले–ऑफ यापूर्वीच दिला जात आहे.

बाजारात कापडाला पुरेशी मागणी नसल्याने कापड गिरण्यातहि अशीच परिस्थिती आहे.

वेतन–गोठवणुकीने आपले काम केले आहे. त्याने किंमती उतरलेल्या नाहीत, उलट कापडासारख्या आवश्यक वस्तू खरेदी करणे मात्र कामगारांना कठीण झाले आहे. त्याने फक्त अरिष्टाला आणि मंदीला आणखी वेग दिला आहे.

कॉम्रेडस्, एप्रिल महिन्यांत अरिष्ट अधिकच तीव्र झाले आहे आणि असे दिसते की १९३० च्या अरिष्टानंतरच्या काळांतील सर्वांत भीषण अरिष्ट आपल्यावर कोसळू पहात आहे. कारखान्यामागून कारखाने बंद होण्याचा, प्रचंड प्रमाणावर

कामगारकपात होण्याचा आणि मग किंमती घसरल्याने लाखो शेतकऱ्यांची संपूर्ण वाताहत होण्याचा धोका वाढून ठेवलेला आहे. वीजटंचाईने यात आणखी भर पडली आहे. ही वीजटंचाई भांडवलदारी नोकरशाही पध्दतीचे नियोजन आणि गैरकारभार यांचेच अपत्य आहे. पण त्याला बळी पडणार आहेत मुख्यत: कामगार, छोटे मालक आणि उत्पादक.

एप्रिल महिन्यापर्यंत कानपूरमध्ये हजारो कामगारांना वीजटंचाईमुळे घरी पाठविण्यांत आले. वृत्तपत्रांचे म्हणणे होते की, गिरण्यांनी मागणी केल्याप्रमाणे विजेचा पुरवठा दोन पाळ्याएवढा वाढविला तरीहि कित्येक कापड गिरण्या 'आजारी' होण्याचा संभव होता. शिवाय तलम आणि मध्यम प्रतीच्या कापडाची मागणी वाढली नाही तर उत्तर प्रदेशच्या इतर केन्द्रातील एकूण २७ गिरण्यांपैकी १० गिरण्या आजारी पडण्याचा धोका होता. त्यांना एक पाळीसुध्दां चालू ठेवणे कठीण झाले होते आणि बहुतेकांकडे मोठ्या प्रमाणावर बाकी साचली होती.

लोकांच्या क्रयशक्तींत मोठी घट झाल्यामुळे पायताणे आणि चामड्याच्या इतर वस्तू, विद्यार्थ्यांच्या वह्या आणि सामान्य वापरांतील इतर वस्तू यांचा खप मोठ्या प्रमाणांत कमी झाला.

अरिष्टाने कोणाची वाताहत झाली आहे याबद्दल अजून कांही शंका असल्यास ही माहिती घ्या. उत्तर प्रदेशांत विड्यांचा खप शेंकडा २० टक्क्यांनी कमी झाला, रोज मजुरीचे दर ५ रुपयावरून ३॥ रुपयावर आले, हलक्या कामासाठी लाखो लोक अर्ज करीत आहेत आणि शेकडो कुटुंबें पक्की घरे सोडून कच्च्या झोपड्यांत जात आहेत.

ह्या बातम्या देणारा वार्ताहर पुढे म्हणतो, "गिरण्यांच्या कापडाची मागणी बरीच उतरली आहे व ह्या घसरगुंडीने हातमाग आणि यंत्रमाग क्षेत्राला एवढेच नव्हे तर खादी विभागालाहि पछाडले आहे. यामुळे कित्येक वर्षांत नव्हती एवढी मागणी खाली आली आहे."

तामिळनाडूमध्यें वीजपुरवठा जवळजवळ बंद पडल्यामुळे औद्योगिक उत्पादन थंडावले आहे आणि १५ लाख कामगारांना ले–ऑफ मिळत आहे. बऱ्याच बाबतीत मागणीच्या अभावी कारखाने बंद पडायला आले होते. त्या कारणावर आता विजेच्या अभावाचे पांघरूण मात्र पडले आहे.

**मुंबईत हजारो रेशीम कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड लटकत आहे.**

ज्यूट धंद्यांत एव्हानाच गिरण्यांनी उत्पादन १५ टक्क्यांनी कमी करण्याची सुरुवात केली आहे. हा सरसकट नियम होऊन मोठ्या प्रमाणावर कामगार-कपात होण्याचा संभव आहे. परिणामी, ८–१० वर्षांपूर्वी १०० कोटी रुपये खर्च करून गिरण्यांत बसविलेली कार्पेट–बॅगिंगची यंत्रसामुग्री रिकामी पडून आहे.

कॉम्रेडस्, ही परिस्थिती फार गंभीर आहे. भारताच्या कामगारवर्गासमोर अशी परिस्थिती कित्येक वर्षं आली नव्हती. बेकारीच्या वाढत्या आकड्यांच्या संदर्भात ह्याचा अर्थ काय हे आपणा सर्वांना माहीत आहे. शिवाय खाजगी संघटित बिगर–शेतकी उद्योगांत रोजगाराचा आंकडा १९७३ च्या मानाने १९७४ मध्ये कमी झाला ही घटना बोलकी आहे. मालक आणि सरकार दोघेहि याचा जास्तीत जास्त फायदा घेऊ पहात आहेत. लोकांना नागवून सरकारकडून आर्थिक सवलती उपटण्यासाठी मालक पुष्कळदा कारखाने सर्रास बंद पडण्याची भीति दाखवत असतात. हीच भीति दाखवून मध्यस्थाचा आव आणणारे सरकारी प्रवक्ते कामगारांना कामगारकपात किंवा पाळीपाळीनें काम करण्याची म्हणजे बेकारी वाटून घेण्याची पध्दती मान्य करायला सांगतात. यांत प. बंगालचे सरकार पुढे आहे. बेकारभत्त्याची जबाबदारी स्वीकारणे अद्याप ज्याला भाग पडलेले नाही अशा भांडवलदारी सरकारच्या ह्या नेहमीच्या युक्त्या आहेत. कॉंग्रेसच्या मजूर-मंत्र्यांच्या खोट्या सूचनांना कामगारवर्गाने बळी पडता कामा नये.

अलीकडे प. बंगालच्या मजूर खात्याने ट्रेड युनियन्सची एक सभा ज्यूट धंद्याच्या स्थितीची चर्चा करायला बोलावली होती. जास्त वेतन न घेता आठवड्याचे सात दिवस काम करावे, थोडक्यांत म्हणजे कमी पगारात जास्त काम करून उत्पादन कसे वाढवावे, यासंबंधीच्या सूचना सरकारतर्फे या सभेत मांडण्यात आल्या. परदेशच्या ऑर्डरी कमी झाल्या आहेत आणि गिरण्यात माल सांचून आहे अशा वेळीं उत्पादन वाढवण्याचा हा तगादा कशासाठी असे त्यांना विचारण्यात आले तेव्हां त्या सद्गृहस्थाने सांगितले की, कमी पगारांत जास्त उत्पादन काढल्याने उत्पादनखर्च कमी होऊन मालकांना परदेशी बाजारपेठेत माल विकणे सोपे होईल. याचा अर्थ स्पष्ट आहे. भांडवलदारांना कामगारांना लुबाडून गडगंज नफ्याची हमी हवी आहे. ज्यूटचा माल परदेशांत खपावा यासाठी नफा कमी घेऊन स्वस्तांत माल विकण्याची त्यांची तयारी नाही.

### परिस्थिती अधिक बिघडण्याची शक्यता

ऑक्टोबरमध्ये लोखंड–पोलादाच्या कंट्रोलर महाशयांनी तक्रार केली की त्यांनी ठरवून दिलेले कोटेही कोणी उचलीत नाही. पण लवकरच उलटी जाहिरात झाली

की सर्वच साठा उचलण्यांत आला आहे आणि सर्व काही ठीक आहे. प्रत्यक्षात साचलेला माल निरनिराळ्या गुदामात रवाना करण्यात आला एवढेच खरोखरी झालेले दिसते. जानेवारीत अशी बातमी होती की हिंदुस्थान स्टीलच्या दिल्लीच्या गुदामात ३०,००० टन पोलाद म्हणजे नेहमीच्या मानाने दुप्पट माल पडून होता. तसेच दिल्लीच्या लघुउद्योग निगमाजवळ ४००० टन पोलादाचा साठा साचला होता. तोही नेहमीच्या साठ्याच्या मानाने अतिशय जास्त होता आणि इतर अनेक शहरात हीच परिस्थिती होती.

एकीकडे मागणी कमी झालेली नाही असा गाजावाजा सरकार करीत होते. तर दुसरीकडे बोकारा पोलाद कारखान्याने माल फार साचल्यामुळे लोखंड–पोलादाचे उत्पादन कमी करण्याचा निर्णय जाहीर केला. माल साचून राहिला याचे अधिकृत कारण काय तर रेल्वेमध्ये वाघिणींचा तुटवडा!

फेब्रुवारीच्या शेवटास वृत्तपत्रांच्या बातम्यांनुसार रेल्वे डब्यांच्या उद्योगांपाशी २५,००० डबे म्हणजे जवळजवळ दोन वर्षांचे उत्पादन पडून होते. यांत भर घाला वाघिणीवर कमी खर्च करण्याच्या सरकारी निर्णयाची. निष्पन्न काय होते ? छोटे कारखाने बंद पडणे आणि मोठ्या कारखान्यांच्या उत्पादनात २५ टक्क्यांची कपात ! खुद्द चित्तरंजनमध्ये २० टक्के उत्पादनक्षमता वाया चालली आहे.

मार्चच्या शेवटास उद्योगधंद्यांच्या केन्द्रीय सल्लागार मंडळापुढे भाषण करताना उद्योगमंत्री श्री. पै म्हणाले होते की, फक्त १० उद्योगांत क्षमतेचा वापर ७० टक्क्यांच्या वर असून साधारणपणे १२ उद्योगांत तो ५० ते ७० टक्क्यांच्या दरम्यान होता, असे अलीकडच्या एका पहाणीत आढळून आले आहे.

आजची आर्थिक परिस्थिती किंवा मंदीची हवा ही अशी आहे. आपल्या नोकऱ्यांवर आणि राहणीमानावर यापुढेहि हल्ले होत रहाणार हेच त्यातून सूचित होत आहे.

बरे, नजिकच्या भविष्यकाळांत तरी परिस्थितींत कांही सुधारणा होण्याची लक्षणे आहेत का? सध्याचे प्रवाह आणि घडामोडी अशा अपेक्षा बाळगण्यास अनुकूल नाहीत. इंदिरा गांधी देशाला कांहीहि आश्वासने देवोत, सध्याची उत्पादनाची कुचंबणा आणि मंदी चालूच रहाणार, नव्हे घसरगुंडी अधिकच होणार अशी चिन्हे आहेत.

सरकारचा स्वतःचा स्वतःच्या शब्दांवर फारसा विश्वास दिसत नाही. फार तर आहे ती परिस्थिति तशीच राहील हे सरकारलाहि कबूल करावे लागते.

१९७४–७५ च्या आर्थिक पहाणी अहवालांत स्वच्छ म्हटले आहे की, "१९६६ पासून औद्योगिक उत्पादनाला जे अत्यंत असमाधानकारक वळण लागले आहे ते जाऊन त्याच्या जागी नवी अधिक गतिमान अवस्था चालू होईल असे म्हणायला अद्याप-तरी कांही पुरावा नाही."

## निर्यात आणि जागतिक भांडवलदारी अरिष्ट

कॉम्रेडस, एवढी वर्षे वेतनाचे प्रश्न आणि आपल्याशी सरळ संबंधित असलेले तसलेच इतर प्रश्न यापुरती आपली चळवळ मर्यादित होती. आपण त्या-पलीकडे गेलो नाही. सरकारच्या आयात–निर्यातीच्या धोरणांचा आपल्या नोकऱ्यांवर आणि कमाईवर कसा परिणाम होत असतो, राष्ट्रीय हिताच्या रक्षणाच्या नावाखाली भांडवलदारवर्गाच्या हिताच्या दृष्टीने सरकार आपल्या निर्यात धोरणात कसे फेरफार करीत असते या गोष्टी समजून घेण्याचा आपण प्रयत्नच केला नव्हता.

परदेशी बाजारपेठ भरभराटींत असते तेव्हा भांडवलदारांना गडगंज नफे मिळतात; पण त्यावेळी कामगारवर्गाच्या स्थितीत कांही सुधारणा करावी असे कसलेहि बंधन त्यांच्यावर नसते. मात्र परदेशी बाजारपेठ थंडावते तेव्हा कर भरणाऱ्या नागरिकांना नागवून भांडवलदारांना निर्यातीसाठी म्हणून सरकारकडून सवलती मिळतात, आणि शिवाय कामगारांच्या रहाणीमानावर हल्ले चढविण्यासहि त्यांना प्रोत्साहन दिले जाते. परदेशी चलन कमावण्याची राष्ट्रीय गरज भागवण्यासाठी हे सारे आवश्यक आवश्यक आहे अशी मखलाशी करण्यात येते.

पाश्चात्य जगांत चलनवाढीचा पूर आला होता तेव्हा भारतांत उत्पादन घसरत असूनहि देशाच्या निर्यातीला बहर आला होता. आता पाश्चात्य जग मंदीच्या गर्तेत खोल बुडत चालले आहे आणि भारतीय निर्यात मालाची मागणी बरीच घसरू पहात आहे. अशा स्थितीत हिंदी अर्थव्यवस्थेला मोठे धक्के खावे लागणार हे उघड आहे.

यापैकी कांही मालाची निर्यात १९७५–७६ मध्ये बरीच घटणार असे गृहीत धरून अर्थखात्याने ती टिकवून धरण्यासाठी सब्सिडी देण्याची एव्हानाच तयारी चालविली आहे. ज्यूट, सुती कापड आणि इतर कांही मालाला परदेशांत तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे आणि त्यांची निर्यात कमी होणार आहे. आर्थिक पहाणी अहवालात याची कबुली देताना म्हटले आहे की, "उद्योगप्रधान देशात मोठी मंदी आल्यामुळे आपल्या निर्यातीच्या वाढीवर आणि परिणामी आपल्या औद्योगिक उत्पादनावर कांही प्रतिकूल परिणाम होईल ही शक्यता

झाली असती. परंतु ह्या वर्गाशी झगडण्याची सरकारची इच्छा नाही आणि म्हणून भाववाढीविरुद्ध पावले उचलण्याच्या नावाखाली त्याने स्वतःचीच भांडवल गुंतवणूक कमी करून टाकली.

१९६५–६६ च्या किंमतीमध्ये मोजल्यास देशाचा एकूण भांडवली खर्च १९७२–७३ साली १२०४ कोटी रुपये होता व तो १९७३–७४ साली ८५९ कोटी रुपये झाला. परिणाम हा झाला की, सरकारी खात्यांच्या खर्चावर अवलंबून असलेल्या रेल्वे-वाघिणीसारख्या धंद्यांच्या मालाची विक्री कमी होऊन त्यांना जबर फटका बसला. निरनिराळ्या प्रकल्पांची उभारणी करण्यात वाटेकरी असणारे उद्योग, तसेच त्यांच्याशी संबंधित असलेले इतर खाजगी उद्योग सर्वांनाच ठोकर बसली. बऱ्याच ठिकाणी ले-ऑफ मिळण्याचे हे कारण आहे.

१९७५–७६ च्या अर्थसंकल्पाने चित्र फारसे बदलत नाही. १९७५–७६ ची एकूण (केन्द्र व राज्ये सर्व धरून) योजना ५०६० कोटी रुपयांची आहे. १९७४–७५ च्या ४८४४ कोटींच्या योजनेच्या मानाने यांत पैसा २३ टक्क्यांनी वाढलेला दिसतो. परंतु गेल्या एक वर्षांत किंमती २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत, हे विचारांत घेता ही वाढ नगण्य आहे. वास्तविक गेल्या वर्षी सार्वजनिक गुंतवणुकीने अगदीच खालची पायरी गांठली होती.

अर्थसंकल्पात उलाढाली करून रोजगार आणि बेकारी यासंबंधीचे प्रश्न कामगारांच्या नकळत निकालात काढण्यांत येतात ते अशा तऱ्हेने. ट्रेड युनियन्सनी ही फसवणुकीची कहाणी उघडचावर मांडावी आणि कामगारांनी त्याविरुद्ध आपला निषेधाचा आवाज उठवावा अशी वेळ आलेली आहे. सर्व परदेशी आणि मक्तेदारी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करा आणि नियोजित सार्वजनिक उत्पादन वाढविण्यासाठी त्यांच्या साधनसंपत्तीचा उपयोग करा अशी मागणी करण्याची वेळ आलेली आहे. अर्थात् हेहि स्पष्ट आहे की सार्वजनिक मालकीचा विभाग हा आजच्याप्रमाणे भ्रष्ट नोकरशहांचे आणि मंत्र्यांच्या हुजऱ्यांचे चरण्याचे कुरण म्हणूनच रहाणार असेल तर त्यांतून कांहीच फायदा होणार नाही. आज हा विभाग भांडवलदारांची सेवा बजावत आहे, ते बंद होऊन जनतेची सेवा करणारा खराखुरा सार्वजनिक विभाग म्हणून त्याचे काम चालावे याची तरतूद करावी लागेल.

## मक्तेदारांची भरभराट

सरकारचे धोरण मक्तेदारांच्या आणि बड्या भांडवलदारांच्या स्वार्थाला सतत खतपाणी पुरवठ्याचे आहे. श्री. जी. डी. बिर्ला ह्या कुप्रसिद्ध मक्तेदार अग्रणीने केलेला इंदिरा सरकारचा गौरव खरोखरीच विदारक प्रकाश टाकणारा आहे.

अर्थातच आपण नाकारू शकत नाही. ओईसीडी (आर्थिक सहकार्य व विकास संघटना) ने असे भाकित केले आहे की, यंदा म्हणजे लागोपाठ दुसऱ्या वर्षी बड्या उद्योगप्रधान देशांत विशेष कांही प्रगति होणार नाही."

याचा अर्थ निर्यात वाढविण्यासाठी कसून प्रयत्न होणार. भारताचा निर्यात माल जागतिक बाजारपेठेत इतर देशांच्या चढाओढीला टक्कर देऊ शकेल एवढा स्वस्त झाला पाहिजे ही हाकाटी सुरू झालीच आहे. तिचा अर्थ शेवटी हा की, कामगारांचे वेतन / कमाई जास्तीत जास्त कापून खाली आणा किंवा आधुनिक नवी यंत्रसामुग्री आणून नोकरीवरील कामगारांची संख्या कमी करा.

ट्रेड युनियन चळवळीने आग्रह धरला पाहिजे की, भांडवलदारांचे असले लाड बंद झाले पाहिजेत; त्यांना कमी नफ्यांत समाधान मानायला लावले पाहिजे. निर्यातीला सब्सिडीचा आधार हवाच असेल तर त्यांनी अलिकडे कमावलेल्या प्रचंड नफ्याचाच कांही भाग त्या कामी खर्च करावा.

कामगारवर्गाला याची जाणीव झाली पाहिजे की आपली अर्थव्यवस्था मंदीने पछाडलेल्या पाश्चात्य जगाशी जोडून ठेवण्याचे कॉंग्रेस सरकारचे धोरण आपल्या हिताच्या दृष्टीने धोक्याचे आहे. कामगारांमधून मागणी आली पाहिजे की समाजसत्तावादी देशांच्या, विशेषत: चीनच्या अर्थव्यवस्थेशी आपल्या देशाने जास्त बळकट संबंध ठेवले पाहिजेत. समाजवादी जगाच्या अरिष्टमुक्त सुस्थिर अर्थव्यवस्थांत आपल्याला खात्रीलायक आणि वाढत्या बाजारपेठा मिळू शकतील.

## सार्वजनिक गुंतवणूक

कॉम्रेडस्, चलनवाढीला आळा घालण्यासाठी म्हणून सरकाने बुद्धीपुरस्सर जे उपाय योजले आहेत, त्यांच्यामुळे देशांत रोजगाराची वाढ मंदावली असून बेकारीत भर पडली आहे याची सर्वांना जाणीव दिसत नाही. अल्पविकसित देशांमध्ये सरकारची नियोजित भांडवल गुंतवणूक किती वाढते यावरच बव्हंशी रोजगाराची वाढ अवलंबून असते. कामगारवर्गाने आणि लोकशाहीवादी जनमताने वारंवार मागणी उठवलेली आहे की सरकारने खर्चातली उधळमाधळ आणि तुटीचा अर्थ-भरणा बंद करून किमतींवर नियंत्रण ठेवावे. पण त्याचबरोबर त्यांनी हेहि सांगितलेले आहे की मक्तेदार, बडे भांडवलदार आणि जमीनदार यांवर योग्य कर बसवून उत्पादन–क्रियेला उत्तेजन द्यावे आणि उत्पादन वाढविण्यामध्ये सार्वजनिक मालकीच्या विभागाचा हिस्सा आणखी वाढवावा.

ह्या गटांची साधनसंपत्ती ताब्यांत घेऊन सार्वजनिक कामाला लावली असती, तर त्याने भाववाढ थांबवायला तसेच उत्पादन आणि रोजगार वाढवायला मदत

ग्वाल्हेर येथून १८ मार्च रोजी प्र. ट्र. इं. ने पाठवलेल्या एका वृत्तात म्हटले आहे की, "सरकारवर केवळ टीकेखातर टीका करण्याची जी संवय धंदेवाल्या मंडळींना लागली आहे तिची बडे उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला यांनी टर उडवली. सरकारच्या सध्याच्या धोरणाचे कौतुक करून बिर्लाशेठ म्हणाले की, व्यवहारांत सरकार मक्तेदार घराण्यांच्या बाबतीत फार कडक वागते असे आपल्याला वाटत नाही. त्यांच्यावर टीका होते ती फक्त भाषणात, परवाने देण्याच्या बाबतीत पाहिले तर बड्या व छोट्या दोन्ही विभागांना सारखीच वागणूक मिळते."

आयटकचे उजवे कम्युनिस्ट पुढारी हे वाचून इंदिरा गांधींबद्दलचे आपले मत बदलतील का ? शंका आहे. उलट बिर्ला शेठजींबद्दलचे मत बदलून त्यांनाच ते प्रगतिशील शक्तीत सामील करतील हीच शक्यता जास्त !

बिर्लाशेठ खरे तेच सांगत होते. इंदिरा गांधीचे प्रवक्ते मक्तेदारांवर तोंडसुख घेतात खरे पण तो मक्तेदारांचे स्वार्थ पोसण्याच्या खऱ्या व्यवहारावरचा पडदा फक्त असतो. सध्या भांडवलाची चणचण आहे. या नावाखाली त्यांना सर्वच क्षेत्रांत भांडवल गुंतवण्यास सांगण्यात येत आहे. त्यांना नवे मार्ग खुले करून देण्यासाठी नित्य नवी युक्ती वापरली जात आहे.

शिवाय बिर्लाशेठ खुष कां असू नये? १९५१ ते १९७० या काळात त्यांची मालमत्ता ५१ कोटी रु. वरून ६९७ कोटींवर पोचली आहे, तर त्याच कालावधीत टाटांची संपत्ती ९५ कोटी वरून ७११ कोटीवर गेली आहे. (अर्थात एवढे होऊनसुद्धा जे. आर. डी. टाटांनी अलीकडच्या एका सभेंत तक्रार केलीच कीं, खाजगी मालकीच्या विभागाची कोंडी होत आहे.) १९७३–७४ साली लोकांची परिस्थिती भयानक होती आणि कामगारांना एकेक नया पैशासाठी लढावे लागत होते, त्यावेळी भांडवलदारांचे कसे चालले होते? १९७३–७४ साली ३५३ बिगर-सरकारी बिगर–आर्थिक कंपन्यांचे, कर भरण्यानंतरचे नफे ५६ कोटी रुपयांनी वाढून २८० कोटी रुपयांवर गेले. त्याच्या अगोदरच्या वर्षात त्यांचे हे नफे १४ कोटी रुपयांनी घटले होते (रिझर्व्ह बँक बुलेटीन, डिसेंबर १९७४). कर आणि व्याज दोहोत झालेली वाढ बाजूला ठेवली तर नफ्यांतली वाढ ९४ कोटी रुपयांवर जाते.

कुल नफे, म्हणजे एकूण वरकड मूल्य किंवा अदत्त श्रम या वर्षात ५९६ कोटी रुपयांवरून ६९० कोटी रुपयांवर गेले, तर लाखो कामगारांची वेतनादि कमाई ९१ कोटी रुपयांनी वाढली.

## नवे स्वातंत्र्य

आता तर हे सरकार मक्तेदारांवर किंवा खाजगी भांडवलदारांवर नियंत्रण ठेवण्याचा देखावाही सोडून देत आहे. मक्तेदारांना ते नवे मार्ग खुले करून देत आहे. उद्योगमंत्री श्री. पै आणि प. बंगालचे मुख्यमंत्री श्री. सिद्धार्थ शंकर राय हे मक्तेदार भांडवलाचे सर्वांत नंगे वकील आहेत. दोघेही इंदिराबाईच्याच इच्छांना वाचा फोडीत आहेत. सार्वजनिक मालकीच्या विभागात जनतेला भागीदार करून घेण्याच्या नावाखाली तो विभाग खाजगी उद्योगपतींना विकून टाकण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. शिवाय श्री. पै यांच्यामार्फत सरकार भांडवलदारांना किंमतीचे निर्नियंत्रण, निदान शेंकडा १६ टक्क्याएवढा भरमसाट नफ्याचा दर वगैरे गोष्टी देऊ करीत आहे व त्या सर्वांचा अर्थ आहे कामगारांची आणखी क्रूर पिळवणूक. गरीबी हटावचे चक्र पुरे फिरून झाले आहे. कामगारांना किमान वेतनाची हमी देण्याऐवजी ते भांडवलदारांना भरमसाट नफ्याची हमी देत आहेत. काँग्रेस समाजवादाची घोडदौड चालू आहे!

आपला देश स्वावलंबनाच्या दिशेने पुढे नेण्याचा सरकारचा निर्धार आहे असे पांचव्या पंचवार्षिक योजनेने जाहीर केले होते. त्याचे झाले काय? आमच्या मिश्र अर्थव्यवस्थेला परदेशी कर्जांची अधिकच गरज भासत आहे. शिवाय सरकारने पीएल ४८० खाली अमेरिकेचे धान्य आयात करण्याचे मान्य केले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेची परदेशी कर्जावरची वाढती भिस्त आपल्या आर्थिक स्वातंत्र्याला धोका निर्माण करीत आहे.

## परदेशी भांडवलाची खुशामत

सर्वात धोक्याची गोष्ट म्हणजे बहुराष्ट्रीय महामंडळांची निर्लज्जपणे खुशामत चालली आहे. ही महामंडळे म्हणजे लोकशाही, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि कामगारवर्ग यांचा कट्टर शत्रू होय. ती केवळ उद्योगमंडळे नाहीत तर आर्थिक साम्राज्ये आहेत. त्यांच्या २०० हून अधिक शाखा असाव्यातसे दिसते. सरकारे खाली ओढणे आणि आपले मनसुबे पार पाडण्यासाठी आपली बाहुली सत्तारुढ करणे हा त्यांचा धंदा आहे. ह्याच मंडळांनी कट करून चिलीमधले आयेंदे सरकार उलथून टाकले. इंदिरा सरकार मधूनमधून सीआयएच्या कारवायांबद्दल गर्जून बोलत असते, परंतु अमेरिकन साम्राज्यशाहीच्या या महत्वाच्या संस्थेला पायबंद घालण्यासाठी प्रत्यक्षांत त्याने कांहीएक केलेले नाही.

एका विख्यात दैनिकात अलीकडेच एका लेखकाने लिहिलेल्या लेखातला हा उतारा पहा– आता उजेडांत आलेली एक गोष्ट ही की ऑगस्ट १९७४ मध्ये

जागतिक अन्नटंचाईवर सीआयएचा एक संशोधनपर अहवाल तयार झाला होता व त्यांत म्हटले होते कीं, भारतासारख्या विकसनशील देशातली परिस्थिती अशी आहे की, अमेरिकेला पूर्वी कधी नव्हती एवढी सत्ता मिळू शकेल; युद्धानंतरच्या दोन वर्षात जे कांही आर्थिक आणि राजकीय वर्चस्व अमेरिकेच्या हाती आले होते त्याहूनही जास्त वर्चस्व हाती येण्याची ही संधी आहे. कोटयवधि भुकेल्या लोकांच्या जीवन-मरणाचा फैसला करण्याची सत्ता वॉशिंग्टनला काबीज करता येईल (जे. डी. सेठी, **अमृतबझार पत्रिका**).

बहुराष्ट्रीय महामंडळाचा अनुनय करण्याच्या काँग्रेसच्या धोरणाचा कामगार-वर्गाने स्वतःच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीने धिक्कार केला पाहिजे, आणि त्याविरुद्ध जनतेला सावध केले पाहिजे.

## भाववाढीपासून सुटका नाही

चलनवाढीला आणि भाववाढीला आळा घालण्याच्या नावाखाली दहा महिन्यां-पूर्वी सरकारने वेतन–गोठवणुकीचा कुप्रसिद्ध कायदा केला.

कामगार, पगारदार कर्मचारी आणि व्यावसायिक यांच्यावर हल्ला करण्याच्या या धोरणाला कोणते फळ आले आहे? कामगार–कर्मचाऱ्यांच्या खिशातून ५०० कोटी रुपयांहून जास्त रक्कम काढून घेऊन सरकारने काय साधले आहे.?

सरकार म्हणते कीं, किमती उतरू लागल्या आहेत. पण लोकांना याचा पत्ता आहे का? त्यांना कांही मदत झाली आहे का? अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तू कामगारांच्या आणि इतर श्रमिकांच्या सहज आटोक्यात आल्या आहेत कां ?

हे खरे कीं अन्नधान्याच्या घाऊक किंमती सप्टेंबर १९७४ अखेरपासून १५ फेब्रुवारी १९७५ पर्यंतच्या काळात ७ टक्क्यांनी खाली आल्या आहेत. सर्वसाधारण किंमतीच्या निर्देशांकातही ५ टक्क्यांनी घट झाली आहे.

ही घट होऊनसुद्धा डिसेंबर १९७४ च्या किंमती वर्षाअगोदरच्या मानाने १८.८ टक्क्यांनी वाढलेल्या होत्या. आर्थिक पहाणी अहवालातही किंमती वाढायच्या थांबतील असे आश्वासन मिळत नाही. भाववाढीचा वेग अमळ कमी होईल एवढेच आश्वासन त्यात आहे. 'ह्या सर्व गोष्टींचा विचार करता एवढी अपेक्षा करता येईल की येत्या कांही महिन्यांत किंमती चढत जाण्याचा वेग गेल्या वर्षीच्या त्याच महिन्यांच्या मानाने कमी राहील.' वेतन गोठवणूक हे केवळ कामगारांना लुबाडण्याचे एक साधन होते; अरिष्टाचा बोजा त्यांच्या शिरावर ढकलण्याचे कार्य फक्त त्यामार्फत साधून घेण्यात आले.

## जमीनदारशाहीविरुद्ध

परंतु नित्याची अन्नटंचाई आणि काळा बाजार यांतून कायमची सुटका हवी असेल तर कामगारवर्गाने इंदिरा सरकारच्या जमीनदारधार्जिण्या धोरणांवर मारा केंद्रित केला पाहिजे आणि तीं हाणून पाडली पाहिजेत. आपल्या देशात संख्येने अतिविशाल असलेल्या शेतमजूर–शेतकरी वर्गांशी कामगारवर्गाने एकजूट साधली पाहिजे आणि एकजूट करून, जमीनदारांची जमीनमालकीची मक्तेदारी मोडून काढा आणि कसणाऱ्यांमध्ये जमिनीचे फेरवाटप करा, अशा मागण्या उठवल्या पाहिजेत. अशी शेतकरी क्रांति झाल्याखेरीज भाववाढ आणि अन्नाचा दुष्काळ यातून सुटका होणार नाही किंवा शेतकऱ्यांचे दारिद्र्यही दूर होणार नाही. ताबडतोबीच्या आपल्या मागण्या म्हणजे जमीनदारांचे धान्यसाठे ठरलेल्या किंमती देऊन ताब्यांत घ्या, लहान शेतकऱ्यांना आकर्षक किंमती आणि वर बोनस देऊन त्यांचे पीक विकत घ्या आणि अन्नधान्याचा सारा घाऊक व्यापार सरकारतर्फे चालवा. कामगारवर्गाला हे शिक्षण देणे आणि आपल्या अर्थव्यवस्थेवरील जमीनदारी वर्चस्वाविरुद्ध लढण्यास त्यांना परावृत्त करणे हे ट्रेड युनियन्सचे कार्य आहे.

## भरमसाट कर

कॉम्रेडस, अरिष्टाचा बोजा कामगारांच्या आणि जनतेच्या शिरावर टाकण्याचे भाववाढ हेच एक साधन नाही. आपल्या निगरगट्ट राज्यकर्त्यांनी ह्या कामी वापरांत आणलेले दुसरे साधन म्हणजे प्रचंड करवाढ. ह्या करवाढीने सर्वच वस्तूंचे भाव वाढतात. पुढारलेल्या भांडवलदारी देशांतही हाच प्रकार आढळतो. १९७४–७५ च्या एकाच वर्षात केंद्र सरकारने ९३५ कोटी रुपयांचे नवे जादा कर बसवले.

त्या करवाढीचे सर्वात ठळक वैशिष्ठ्य हे की तिचा मुख्य भर वस्तूंवरचे कर वाढवण्यावर असतो आणि त्यामुळे भाववाढीच्या चक्राला आणखी गति मिळते.

यामुळे सर्वच वस्तूंच्या आणि सेवांच्या किंमती वाढून लोक त्यांच्या ओझ्याखाली दडपले जातात. उदाहरणार्थ, पेट्रोलच्या किंमतीत सरकारी कर आणि जकाती यांचे प्रमाण कच्च्या (क्रूड) तेलाच्या आयात किंमतीच्या मानाने चक्क पावणेचारपट आहे! वाहतुकीचा खर्च याने वाढतो. १९७२ सालचा अंदाज होता की कित्येक नित्योपयोगी वस्तूचा जो उत्पादनखर्च होता त्याच्या मानाने त्या वस्तूंवरचे केंद्र सरकारचे अप्रत्यक्ष कर ५० ते ७५ टक्क्यांएवढे होते. कापडाच्या किमतीत करांचे प्रमाण ५० ते ७५ टक्के होते, साखरेच्या किमतींत ७५ टक्के, सिमेंटच्या किमतीत ६० ते ७० टक्के, तर पोलादाच्या बाबतीत ५० ते ६० टक्के.

म्हणजे केंद्र व राज्य सरकारांची करवसुली हीदेखील जनतेची लूट आहे. गरीबांच्या हातातले धन श्रीमंत वर्गांच्या व त्यांच्या सरकारच्या हाती सुपूर्द करण्यास व भाववाढ अधिक करण्यास तिने मदत होत रहाते.

## वेतन गोठवणूक

भाववाढ रोखण्यासाठी सरकारने पहिले पाऊल टाकले ते कामगारांच्या खरेदीशक्तीला आळा घालण्याचे. परंतु या खेपेस हल्ल्याचे क्षेत्र बरेच अधिक विस्तृत करावयाचे होते आणि अरिष्टाचे जबरदस्त ओझे लोकांच्या फार मोठ्या विभागावर टाकायचे होते. कामगारच नव्हे तर कर्मचारी, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, इंजिनियर– थोडक्यांत म्हणजे जे कोणी प्रामाणिकपणे मेहनत करून कांही कमावत असतील त्या सर्वांनाच या जाळ्यात ओढण्यात आले. सरकार निःपक्षपाती असल्याचा देखावा करण्यासाठी लाभांशावर (डिव्हिडंडवर) देखील थोडी बंधने घालण्यांत आली. पण यंदाच्या अर्थसंकल्पात तीही दूर करण्यात आली आहेत. थोडक्यांत म्हणजे वेतन गोठवण्याचे उपाय हे भांडवलदार वर्गाचे आपल्या सर्वच सेवकांना– आपण पिळून काढत असलेल्या सर्वांनाच–लुबाडण्याचे वर्गीय उपाय होत हे अगदी स्वच्छ झाले आहे.

याने एक गोष्ट झाली आहे, ती ही की या सर्व विभागांना जाणीव झाली आहे की आपण सर्व एकाच भांडवलदारी जात्यात भरडून निघत आहोत. यांतूनच कामगार–कर्मचाऱ्यांच्या व्यापक संयुक्त कृती आणि लढे निष्पन्न झाले. जनरल सेक्रेटरींच्या रिपोर्टात तुम्हाला त्यांची माहिती मिळाली असेल. सप्टेंबरचे दिल्ली सम्मेलन म्हणजे ऐक्याचे अभूतपूर्व निदर्शन होते. सी. आय. टी. यू च्या युनियन्सनी ही एकजूट पुढे न्यायला पाहिजे आणि इतर विभागांना,–प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर इत्यादि सर्वांना समान लढ्यात येण्याचे आवाहन केले पाहिजे. आपण आशा करूया की लवकरच आपण सर्व– कामगार, कर्मचारी, प्राध्यापक आणि शिक्षक, केन्द्र आणि राज्य सरकारी कर्मचारी सर्व– भांडवलदारी–जमीनदारी सरकारच्या धोरणाविरुद्ध लढाई देण्यासाठी एका सर्वसामान्य संघटनेत एकत्र येऊं. कामगार व कर्मचारी आणि इतर यांमध्ये आज ज्या संघटनात्मक भिंती आहेत त्या कृत्रिम आहेत. राजकर्त्या वर्गाने त्या उभारून ठेवल्या आहेत आणि जेवढ्या लवकर त्या नाहीशा होतील तेवढे उत्तम. वेतन गोठवण्याचा कायदा आणि त्या सोबतचे उपाय यांनी आज शहरी जनतेच्या फार मोठ्या विभागाला त्रस्त करून सोडले आहे त्या सर्वांना सरळ चळवळीत आणले पाहिजे आणि एकूण लढ्याला सरकारी धोरणाविरुद्धच्या विराट निर्दशनाचे स्वरूप दिले पाहिजे.

### पतीवरील नियंत्रणे

विनाशाच्या गर्तेच्या तोंडाशी उभा असलेला दुसरा एक महत्वाचा विभाग म्हणजे छोटचा छोटचा कारखानदारांचा विभाग. पतीवर नियंत्रणे घालून कर्ज मिळण्याच्या शक्यता चेपून टाकण्याच्या सरकारी धोरणामुळे या विभागाची पुरी वाताहत होऊ पहात आहे. याने सहस्त्रावधि कामगारांवरही आपत्ति कोसळणार आहे. कारण उद्योगधंद्यांतील एकूण कामगारांपैकी ४० टक्के कामगार छोटचा कारखान्यांत कामावर आहेत. पतीवरचा हा अंकुश सरकारने भाववाढविरोधी उपाय म्हणून बसविला आहे आणि त्याविरुद्ध छोटचा कारखानदारांमधून आवाज उठू लागला आहे.

कॉम्रेडस्, सरकारच्या भाववाढविरोधी उपायांचा फार मोठा बोजा शेतकऱ्यांवर पडलेला आहे. कामगाराप्रमाणे शेतकरी हाही अरिष्टाचा आणि सरकारी इलाजांचा बळी झाला आहे.

पत–नियंत्रणाने आणि सरकारच्या इतर कित्येक उपायांनी ग्रामीण भागांत अनर्थ ओढवला आहे. एकतर अन्नधान्याची प्रतवार लेव्ही हे जमीनदारांना सही-सलामत सोडून लहान शेतकऱ्यांचे सारे पीक हिरावून घेण्याचे एक व्यवस्थित हत्यार झाले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे पतीवरचे नियंत्रण आणि कापूस व ताग खरीदणाऱ्या महामंडळांच्या कारवाया यांच्यापायी कापूस आणि ताग पिकविणाऱ्या छोटचा उत्पादकाची वाताहत झाली आहे. कांही महिन्यांत किंमती ४० टक्क्यांनी घसरल्या. अर्थात त्याने सामान्य माणसाचा कांहीच फायदा झाला नाही. झाला तो व्यापारी सट्टेबाज आणि गिरणी मालक यांचा.

शेवटी खांडसरीवरील कर आणि जकात यांनी खांडसरीच्या उत्पादकांचे वाटोळे झाले आणि हजारो कामगार बेकार बनले आहेत.

### केंद्रीय कर्मचाऱ्यांविरुध्द भेदभाव

कॉम्रेडस, आपल्या सी. आय. टी. यू. ने एका गोष्टीची खास नोंद घेतली पाहिजे. ती ही की केंद्र व राज्य सरकारांचे कर्मचारी, आपले बहाद्दर रेल्वे कामगार आणि संरक्षण खात्याचे कामगार यांना वेतन गोठवणूक कायद्याचे खास भक्ष्य बनवण्यात आले आहे. पे कमिशनच्या अहवालानुसार त्यांना जो वाढीव महागाई भत्ता मिळावयाचा होता त्याचा निम्मा तरी त्यांच्या पदरांत रोकड पडावयास हवा होता. परंतु जुलै १९७४ पासून महागाई भत्यांत चार वाढी लागू झाल्या असतांही ह्या कर्मचाऱ्यांना जवळजवळ कांही एक मिळालेले नाही. रोकड नाही, सक्तीची बचत म्हणूनही नाही. केंद्र आणि राज्य सरकारे कायदा धाब्यावर

बसवून हा सारा वाढीव महागाई भत्ता दडपून ठेवू पहात आहेत. हा शुद्ध दरोडा आहे. पश्चिम बंगालसारख्या कांही निलाजऱ्या राज्य सरकारांनी तर ४–८ रुपयांची भिकार वाढ देऊ करून जखमेवर मीठ चोळले आहे. भारत सरकारने अलीकडेच एक बोगस नि फसवी तडजोड पुढे केली होती. लढाऊ पुढाऱ्यांनी ती फेटाळून लावली हे योग्यच झाले.

केंद्र आणि राज्य सरकारांचे कर्मचारी, रेल्वे आणि संरक्षण खात्यांचे कामगार जो न्याय्य लढा देत आहेत त्यांत आमचा त्यांना भक्कम पाठिंबा आहे. आम्ही मागणी करतो कीं केंद्र व राज्य सरकारांनी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता अडवून ठेवण्याचे बेकायदेशीर पाऊल मागे घ्यावे. मार्च महिन्यांत शौर्याने संप लढणाऱ्या त्रिपुराच्या १०००० सरकारी कर्मचाऱ्यांचे आम्ही हार्दिक अभिनंदन करतो.

कॉम्रेडस, पुष्कळ कामगार मोठ्या काळजीने विचारत असतात की बचत म्हणून जमा केलेला त्यांचा महागाई भत्याचा पैसा सरकारजवळ सुरक्षित राहील कां, तो त्यांना परत मिळेल कां? आम्ही सांगू शकत नाही. मॅनेजमेंट काय किंवा सरकारी अधिकारी काय, कोणीच या पैशाचे नीट हिशेब ठेवीत आहे असे दिसत नाही. यांत कुठे हजारो कामगारांना फसवण्यात आले तर आश्चर्य वाटायला नको. कॉंग्रेसचे मंत्री आणि कॉंग्रेसची सरकारे यांची नितिमत्तेची पातळी पहाता कांहीही घडणे शक्य आहे.

कॉम्रेडस, आपण असे धरून चालायचे का की पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे वेतन गोठवणुकीचा कायदा जुलैमध्ये संपुष्टांत येईल, त्यानंतर आपला महागाई भत्ता मोकळा होईल आणि आपली साचलेली बचत आपल्या रोजच्या गरजा भागवण्यासाठी पुन्हा उपलब्ध होईल?

अशी स्वप्ने उराशी बाळगण्यांत अर्थ नाही. वेतन गोठवणूक कायदा ही तात्पुरती उपाययोजना नव्हे. तो कायमचा करून ठेवलेला कायदा आहे आणि तो रद्द करून घेण्यात कामगारवर्गाला यश आले नाही तर तो असाच कायमचा मानगुटीवर बसणार आहे. भारत–पाक युध्दाचे वेळी खास जाहीर झालेली आणीबाणी ध्या ती जशी कायम टिकून आहे तसा हा कायदाही कायमचा राहणार आहे. मी वर सांगितलेली आर्थिक परिस्थिती, आपल्यावर वाढता बोजा टाकण्याची भांडवलदार-जमीनदारांना भासणारी गरज, मंदीची स्थिती, भांडवलदार–जमीनदार यांच्या बाजूने चाललेला सरकारी पक्षपात – या सर्व गोष्टी स्वच्छ सांगत आहेत की, इंदिरा सरकार आपल्या कमाईवरची मगरमिठी सोडायला तयार होणार नाही.

आपला महागाई भत्ता, आपला पगार कापून घेण्यासाठी हा वेतन-गोठवणूक कायदा वापरला जाईल, नाहीच तर त्याबदली दुसरा उपाय केला जाईल.

आपण आतापासून मागणी केली पाहिजे की हा कायदा व त्यासोबतचे सर्व कायदेशीर इलाज रद्द झालेच पाहिजेत. प्रत्येक व्यासपीठावरून ही मागणी उठली पाहिजे. जर एवढेही करून सरकारने हे कायदे चालूच ठेवण्याचा दुष्ट पवित्रा घेतला तर कामगार–कर्मचारी–व्यावसायिक सर्वांची एकजुटीची ताकद त्याविरुध्द मैदानात उतरली पाहिजे.

### असंघटित उद्योग

कॉम्रेडस, या ठिकाणी मला आपल्याला लहान उद्योगांतील कामगारां-बद्दलच्या आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे. हे कामगार म्हणजे देशांतला एक अत्यंत शोषित विभाग आहे. साऱ्या देशात असे हजारो लहान उद्योग व कारखाने आहेत. एक महाराष्ट्र राज्यच घेतले तर तेथे निदान एक लाख इंजिनियरींग कामगार फॅक्टरी ॲक्टखाली रजिस्टर न झालेल्या लहान कारखान्यांत काम करीत असलेले आढळतील. कलकत्त्यांत आणखी पुष्कळ असतील. अशा कारखान्यांतील हजारो कामगारांना अरिष्टापायी ले-ऑफ मिळत आहे किंवा कामालाच मुकावे लागत आहे. ले-ऑफचा पगार नाही, रिट्रेंचमेंटची भरपाईपण नाही. त्यांचा एकूण पगार बऱ्याच ठिकाणी ३ रु. रोजाहून अधिक नाही. त्यांना महागाई भत्ता नाही, त्यांच्या कामाच्या तासांवर नियंत्रण नाही. अलीकडे महा-राष्ट्र सरकारने इंजिनियरींग धंद्यासाठी नवे किमान वेतन जाहीर केले, पण मालक त्याची अंमलबजावणी करायला तयार नाहीत.

कॉम्रेडस, ह्या असंघटित उद्योगांतील कामगारांना त्यांच्या न्याय्य मागण्या मिळवून घेण्यासाठी संघटित केले पाहिजे; ले-ऑफ आणि रिट्रेंचमेंटची भरपाई त्यांना मिळावी, आरोग्य विमा योजनेचा लाभ त्यांना मिळावा यासाठी आवश्यक तेथे सबसिडी देण्याची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे, सरकारला ती उचलायला लावली पाहिजे.

किमान वेतन कायद्याखाली वर्गीकृत केलेल्या धंद्यांत परिस्थिती अधिकच भयाण आहे. विडी उद्योग यांतला एक आहे. त्यांत जवळजवळ २० लाख काम-गार काम करतात. त्यापैकी फक्त २ लाखांना फॅक्टरी ॲक्टचे संरक्षण आहे. या धंद्यातील पगार १॥ ते ३ रु. रोजापर्यंत आहेत. केवळ एका लहानशा भागाला आपल्या संघटित बळाच्या जोरावर कांही वरच्या श्रेणी मिळवता आल्या आहेत. कॉन्ग्रेस सरकारने ह्या कामगारांचा सरळ गळा कापला आहे. किमान वेतन कायद्या-

नुसार जास्तीत जास्त पांच वर्षाच्या आंतमध्ये वेतनांत दुरुस्ती व्हायला हवी. पण त्रिपुरा सरकारने विडी कामगारांच्या वेतनांत २१ वर्षे कांही बदल केला नाही. पश्चिम बंगालमध्ये १३ वर्षे कांही फरक करण्यांत आला नाही. कायद्याखाली येणाऱ्या धंद्यांपैकी ९४ धंद्यांमध्ये पांच वर्षाहून अधिक काळ वेतनांत सुधारणा झालेली नाही आणि ३४ धंद्यात तर दहा वर्षाहून अधिक काळ सुधारणा झालेली नाही, हे आता अधिकृत रीत्याच मान्य झालेले आहे.

कॉन्ग्रेस सरकार किमान वेतन कायद्याचा उपयोग करतात ती मालकांना संरक्षण देण्यासाठी. कलकत्ता आणि गुजरात येथल्यासारखे लढे करून विडी कामगारांनी आपले दर १००० विडयांना ७ रु. करून घेतले तेव्हा त्याच राज्यांतल्या मजूर मंत्र्यांनी मोठा उदारपणाचा आविर्भाव करून ५ रु. चा राष्ट्रीय किमान दर जाहीर केला!

ह्या विभागातील कामगारांचा बऱ्याच ठिकाणी शेतमजूर-शेतकऱ्यांशी निकटचा संबंध असतो. सी. आय. टी. यू. च्या युनियन्सनी त्यांना संघटना बांधायला मदत केली पाहिजे. त्यांच्या लढ्याने ग्रामीण जनतेतही जागृति पसरेल आणि तिची चळवळ उभी राहायलाही मदत होईल.

## सार्वजनिक मालकीचा विभाग

कॉम्रेडस, सार्वजनिक विभाग भारतांत जेवढा बदनाम झाला आहे तेवढा तो दुसऱ्या कोणत्याच देशात झाला नसेल. अकार्यक्षमता, भ्रष्टाचार, परकीयांशी राष्ट्रघातकी करार, सार्वजनिक पैशाची उधळपट्टी, कमी उत्पादन आणि प्रचंड तोटा या सर्वांशी हा विभाग जणू तादात्म्य पावलेला आहे. फक्त यंदाच्या वर्षी सरकार सांगू लागले आहे की या विभागातले कांही कारखाने आता पूर्ण क्षमतेच्या मानाने ७० टक्क्यापर्यंत उत्पादन करूं लागले असून कांहीना नफाही झाला आहे. यांतले कितींचे नफे खरे आहेत आणि ते गाठण्यातही किंमती वाढवण्याचा हातभार कितपत लागलेला आहे हे सांगणे अशक्य आहे.

परंतु या सार्वजनिक विभागात सार्वजनिक दृष्टीचा अभाव का हे आपण सहज समजू शकतो. कामगारांना मिळणारी वागणूक पाहिली म्हणजे त्याचा उलगडा होतो. कामगारांना जर ह्या उद्योगात समतेच्या पातळीवर भाग घेण्यास सांगितले असते तर ह्या विभागाची अशी दुर्दशा झाली नसती. मग लाचखोरी, भ्रष्टाचार आणि वशिलेबाजी यांना वाव कसा राहिला असता? सार्वजनिक विभागाचे कार्य उत्तम चालायचे तर दोन गोष्टी हव्यात— अधिकाऱ्यांत प्रामाणिकपणा आणि कामगारांमध्ये विश्वास. हिंदुस्थानात दोहोंचा अभाव आहे. कामगारांना गुलाम किंवा

राजाचे आश्रित म्हणून वागविण्यांत येते. याची खात्री करून घ्यावयाची तर ह्या उद्योगांतील स्टँडिंग ऑर्डर्सवरून नजर फिरवावी. त्या सार्वजनिक मालकीच्या कारखान्याऐवजी एखाद्या तुरुंगात शोभण्यासारख्या आहेत! कसलीही कार्यपद्धती न अनुसरता कोणाही कामगाराला मॅनेजमेंट काढून टाकू शकते. समाजवादी सोविएत युनियनच्या तांत्रिक नि आर्थिक सहाय्याने उभारलेला भिलाईचा पोलाद कारखानाच घ्या. तेथल्या स्टँडिंग ऑर्डर्समधले हे कलम आहे. " जर एखाद्या कामगाराला फौजदारी गुन्ह्याबद्दल कोर्टात शिक्षा झाली किंवा एखाद्या कामगाराला कामावर ठेवणे हे गैरसोयीचे किंवा सुरक्षेच्या दृष्टीने गैर आहे अशी जनरल मॅनेजरची, त्याने लेखी नमूद करून ठेवलेल्या कारणास्तव, खात्री झाली तर स्टँडिंग ऑर्डर ३१ मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीचा स्वीकार न करता त्या कामगाराला नोकरीतून सरळ दूर करता येईल किंवा डिसमिस करतां येईल." नीट ऐका!

भिलाईच्या स्टॅन्डिग ऑर्डर २८ मध्ये सांगितले आहे कीं, कामगारांनी वरचेवर कर्जात बुडू नये! आधीच पगार तुटपुंजे आणि महागाई भत्ता गोठवलेला, त्या जखमेवर हे मीठ!

संघटनेचे स्वातंत्र्य कितीसे? स्टॅन्डिग ऑर्डर २९ मध्ये म्हटले आहे कीं, कंपनीच्या आवारांत मॅनेजमेंटच्या परवानगीशिवाय सभा घेतली तर ते शिक्षापात्र गैरवर्तन धरले जाईल.

त्याचप्रमाणे मॅनेजमेंटच्या लेखी परवानगीशिवाय कारखान्याच्या आवारात कसल्याही प्रकारचा फंड वा वर्गणी जमविली किंवा जमवण्याचा प्रचार केला, किंवा मॅनेजमेंटच्या लेखी परवानगीशिवाय कारखान्याच्या आवारात कोणतीही वृत्तपत्रे, पुस्तिका, पत्रके किंवा पोस्टर वाटले किंवा प्रदर्शनार्थ लावले तर ते सर्व गैरवर्तन होईल.

ही म्हणजे चमचा युनियनसाठीच सनद होय. मॅनेजमेंटला नकोशी असलेली युनियन फंड अगर वर्गणी जमवू शकणार नाही किंवा पोस्टर अगर पत्रक काढू शकणार नाही. मूलभूत अधिकार घटनेच्या चोपड्यातच राहू द्या, समाजवादी सहाय्याने उभारलेल्या भिलाईच्या कारखान्यात त्यांचे काम नाही.

मुसलमानांना त्यांच्या व्यक्तिगत कायद्यानुसार एक पत्नी जिवंत असताना दुसरी करण्याची परवानगी आहे, पण भिलाईत त्यासाठी मॅनेजरची परवानगी हवी. आता बायकोदेखील याच सामर्थ्यशाली अधिकाऱ्याच्या पसंतीने करावयास हवी की काय तेवढे बरीक त्या नियमात सांगितलेले नाही.

स्त्रीपुरुषांना समान वेतन देण्यासंबंधी आय. एल. ओ. चा जो क्र. १०० चा संकेत आहे त्याला भारत सरकारने १९५८ साली मान्यता दिली. त्याला आता १६ वर्षे झाली तरी अजूनसुद्धा स्त्रियांना पुरुष करतात त्याच प्रकारचे काम करूनही कमी वेतन मिळत आहे. मान्य झालेल्या ह्या संकेताच्या भंगाबद्दल सी. आय. टी. यू. ने आयएलओला कळवले आहे.

आम्ही हेही सांगितले कीं, स्त्रियांना कमी वेतन देणे हे इंदिरा सरकारने समजून उमजून स्वीकारलेले धोरण आहे. या सरकारनेच नेमलेल्या वेतनमंडळांनी मळे, बांधकाम आणि इतर धंद्यांत स्त्रियांना कमी वेतन देण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत. भारत सरकारच्या केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खात्यातच समान वेतनाच्या तत्वाला हरताळ फासण्याचे काम चालू आहे. राज्यात आणि केंद्रात नेमलेल्या कित्येक किमान वेतन सल्लागार समित्यांनी विषम वेतनांची शिफारस केलेली आहे आणि संबंधित सरकारांनी त्या शिफारशी खुशाल स्वीकारल्या आहेत.

भारत सरकारने समान वेतनाचे तत्त्व औपचारिक रीत्या स्वीकारलेले नाही असे कबूल करण्यास आमच्या मजूर खात्याला मुळीच खंत वाटत नाही. स्त्रियांना मिळणाऱ्या असमान वागणुकीचे समर्थन करताना हे खाते म्हणते : 'पुरुष, स्त्रिया आणि मुले यांच्या वेतन–दरांत फरक असणे ही परंपरागत पद्धति आहे.' मग त्या संकेतावर केलेल्या सहीला अर्थ तो काय? घटनेमध्ये स्त्रीपुरुषांची समता योजित केली आहे त्याचे काय? ती फक्त परकीयांना दाखवण्यासाठी मांडलेली खेळणी आहेत; कुठलेही सुसंस्कृत सरकार हे तत्व एवढ्या निर्लज्जपणे अव्हेरणार नाही. पण आमचे गरीबी हटाव विदूषक काहीही करू शकतात.

असे दिसते की, आयएलओपुढे भारत सरकारचे स्वरूप आम्ही उघडे केल्यामुळे आता स्त्रियांना समान वेतन देऊ करणारा कायदा लवकरच येणार असल्याची जाहीरात भारत सरकारला करावी लागत आहे. आतापर्यंतच्या काँग्रेसच्या आश्वासनांची काय वासलात लागली हे पहाता यावेळीही काही प्रगतिशील कायदा पुढे येईलसे आम्हाला वाटत नाही. बहुधा आंतरराष्ट्रीय महिला वर्षासाठी ही जाहीरात असेल. वर्ष संपले म्हणजे ती विरून जाईल. त्याचे काहीही होवो, समता प्रस्थापित करण्यासाठी आपली चळवळ चालूच राहिली पाहिजे.

**बेकारी**

कॉम्रेडस, गेल्या अधिवेशनात आपण इशारा दिला होता कीं, आपल्या देशामधील बेकारी हा प्रासंगिक घटना नाही. जोपर्यंत आपल्या जनतेवर भांडवल-दारी मार्ग लादण्याचे काँग्रेसचे धोरण चालू आहे तोपर्यंत परिस्थिति अधिकच

इतर काही सार्वजनिक उद्योगांत, विधानसभेच्या किंवा लोकसभेच्या निवडणुकीस निवडणूक प्रतिनिधी म्हणून काम करण्यास कामगारांना स्टॅन्डिग ऑर्डर्सखाली बंदी आहे. शिवाय मॅनेजमेंटच्या परवानगीवाचून कोणत्याही नियतकालिकात काही लेख पाठवण्यास बंदी आहे. (तुम्हाला काव्य स्फुरले तरी प्रथम तुम्ही मॅनेजमेंटची परवानगी काढली पाहिजे.) असल्या महाभयंकर स्टॅन्डिग ऑर्डर्स जारी असताना आपण सार्वजनिक विभागासाठी काम करीत आहोत असे कुठल्या कामगाराला वाटेल? सार्वजनिक मालकीचा विभाग कार्यक्षमतेने चालवायचा असला तर प्रथम या कोंडवाड्याच्या अटी पार काढून टाकल्या पाहिजेत, कामगारांना किमान आर्थिक शाश्वती मिळाली पाहिजे, नोकरशाही ढाचा मोडून टाकला पाहिजे आणि त्यावर कामगारांचे सर्वतोपरी नियंत्रण आणि देखरेख प्रस्थापित केली पाहिजे.

सध्याच्या नोकरशाही आणि भांडवलदारी ढाच्यात सार्वजनिक मालकीच्या विभागाची कल्पना म्हणजे शुध्द चेष्टा आहे, याची कामगारवर्गाला जाणीव आहे. कामगारवर्गाला संपूर्ण ट्रेड युनियन हक्क, नोकरशाही व्यवस्थापनापासून मुक्तता, आणि मक्तेदार–विरोधी कार्यपध्दती, अशा प्रकारचा सार्वजनिक विभाग आम्हाला हवा आहे.

## स्त्रियांविरुद्ध भेदभाव

कॉम्रेडस, आपल्या गेल्या परिषदेत आपण ठरवले होते कीं, स्त्री कामगारांविरुद्ध वेतन वगैरे बाबतीत जो भेदभाव होतो त्याविरुद्ध लढा द्यावा. मळ्यांतील आणि विडी धंद्यातील आपल्या युनियन्सनी हा प्रश्न उचलून घेतला आहे.

स्त्रियांविरुद्ध भेदभाव हे आपण आपल्या चळवळीला मोठे आव्हान मानले पाहिजे. समान कामाला समान पगार या मूलभूत तत्त्वाची ती पायमल्ली आहे.

आज देशाची पंतप्रधान एक महिला आहे. ओरिसासारख्या एका राज्याची मुख्यमंत्रीही एक महिला आहे. पण हा भेदभाव चालूच आहे. वर्गस्वार्थाच्या नात्यापुढे समान स्त्रीत्वाचे नाते शून्यवत ठरते.

वेतनविषयक भेदभावाचीं निवडक उदाहरणे घ्या. १९७२–७३ साली केरळमध्ये चहाच्या मळ्यात पुरुषांना रु. ३.४४ रोज देण्याचे ठरले, तर स्त्रियांना फक्त रु. ३.००, आसाममध्ये पुरुषांना रु. २.९५ मिळाले तर स्त्रियांना रु. २.७५, दोरखंडाच्या धंद्यात पुरुषांना रु. ४.४६ तर स्त्रियांना फक्त रु. ३.१०.

कलकत्त्याच्या विडी धंद्यात १९७२–७३ पर्यंत १००० विड्यांमागे पुरुषांना ५ रु. मिळत तर स्त्रियांना फक्त १ रु. ७५ पैसे. १९७४ च्या संपानंतर पुरुषांचा रोज हजाराला ७ रु. झाला तर स्त्रियांचा ३.५०.

बेकारांत धुमसत असलेल्या असंतोषाची राज्यकर्त्यांना जाणीव आहे. म्हणून काँग्रेसची केंद्र व राज्य सरकारे आणि भांडवलदार त्या असंतोषाला यादवीच्या मार्गाला लावू पहातात. बेकारांना भत्ता देणे आणि नागरीकांना कामाच्या हक्काची शाश्वति देणे या गोष्टी करण्याऐवजी काँगेसचेच मंत्री फक्त भूमिपुत्रांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत, म्हणजे इतर राज्यांतून आलेल्या कामगारांना हाकून दिले पाहिजे अशी मागणी करणाऱ्या घोषणा उठवतात. आसाममधून बंगाली कामगारांना हाकला, बंगालमधून ओरियांना हाकला, मुंबईमधून तामिळी व केरळीयांना घालवा इत्यादी. मुंबईची शिवसेनाच नव्हे तर इतर ठिकाणचे काँग्रेसवालेही ही प्रतिगामी घोषणा उचलून धरतात. जर भारतावर आक्रमण झाले तर सीमेवरील राज्यांतल्याच कामगारांनी भारताचे संरक्षण करावयाचे आहे काय? राष्ट्रीय एकात्मतेविषयी कॉन्ग्रेस कितीही लंब्याचवडचा बाता करीत असली तरी भांडवलदार-जमीनदारी सरकार देशाच्या ऐक्याचे रक्षण करायला खरोखर असमर्थ आहे हे यावरून स्पष्ट दिसते.

## बेकारी निवारणाच्या सरकारी योजना

कॉम्रेडस, ट्रेड युनियन चळवळीने आतापर्यन्त बेकारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे. आता हिटलरच्या धर्तीवर बेकार युवकांचा कामगारवर्गाविरुद्धच वापर होण्याचा हर एक धोका आहे. प. बंगालने दाखवून दिले आहे की हा धोका खराखुरा आहे.

ग्रामीण आणि शहरी भागात पसरलेल्या करोडो बेकारांना भुकेच्या यातनातून आणि लाजिरवाण्या दैन्यातून मुक्त करण्यासाठी आपण ताबडतोब बेकारभत्त्याची आणि रोजगाराच्या हक्काची मागणी केली पाहिजे. हा हक्क घटनेमध्ये मूलभूत हक्क म्हणून नमूद झाला पाहिजे. जे सरकार रोजगाराची हमी देऊ शकत नाही त्या सरकारला अस्तित्वात राहण्याचाच हक्क नाही. बेकारांच्या रक्षणासाठी आपण कामावरच्या सर्व कामगारांची ताकद एकवटली पाहिजे.

कॉम्रेडस, सुशिक्षित आणि ग्रामीण बेकारांची मने वळवण्यासाठी केन्द्र आणि राज्य सरकारांनी अद्भुत भासणाऱ्या बेकारीनिवारण योजना जाहीर करून टाकल्या. ह्या अद्भुत योजनांतून नोकऱ्यांचा पाऊसही तसाच अद्भुत पडावयाचा होता. लोकसभेच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतशा ह्या रोजगार हमी योजनांचा धडाकाही जोरांत चालू आहे. बेकारांना खरोखर उपकारक असलेल्या कुठल्याही उपायाला सी. आय. टी. यू. अवश्य पाठिंबा देते. पण आम्हाला हेही दिसते आहे कीं, यापैकी बहुतेक योजनांच्या शेवटी बेकारांच्या हाती फक्त फसवणूक राहिली आहे आणि मूठभर कंत्राटदारांचे व नोकरशहांचे उखळ पांढरे

बिघडत जाणार आहे. रिट्रेंचमेंट आणि ले–ऑफच्या कुऱ्हाडीखाली सापडलेल्या कामगारांच्या प्रचंड संख्येचा मी यापूर्वीच उल्लेख केला आहे.

आपल्या अर्थव्यवस्थेच्या नागमोडी गतीमुळे लोक फार मोठ्या संख्येने कफल्लक बनत चालले आहेत. एप्रिल ते डिसेंबर १९७३ च्या ९ महिन्यात सार्वजनिक व खाजगी, दोन्ही संघटीत विभागांतील रोजगार अवघ्या शेकडा १.५ टक्क्यांनी वाढला. जिथे एकूण अर्थव्यवस्था वर्षाला शेकडा ०.७ ह्या अतिमंद दराने सरकली तेथे रोजगाराचे दुसरे काय होणार? १९७४ मध्ये विकासाचा अपेक्षित दर शेकडा ३.५ टक्के होता, तेव्हा तर परिस्थिती आणखी खराब झाली असणार. एव्हाना हजारो लोक कसे रस्त्यावर फेकले गेले आहेत हे आपण पाहिलेच आहे.

रोजगार विनिमय केंद्रात नोंदलेल्या अर्जदारांची संख्या यामुळे फुगतच चालली आहे. आपली गेली परिषद संपून वर्ष लोटले नाही तोच बेकारांची संख्या १० टक्क्यांनी वाढली आणि जून १९७४ पर्यन्त ती ८३ लक्ष ५४ हजारावर गेली. १९७२–७३ मध्ये बेकारांची संख्या ३३ टक्क्यांनी वाढली होती. त्या मानाने गतवर्षीच्या वाढीचा दर थोडा कमी आहे, यांतच आर्थिक पहाणी अहवालाने समाधान मानून घेतले आहे.

ऑगस्ट १९७४ मध्ये नोंदलेल्या बेकारांची संख्या ८७ लाखावर गेली होती. अलीकडच्या महिन्यात ही संख्या आणखी झपाट्याने वाढावयास हवी. परंतु नावे बदलून आणि दुसऱ्या युक्त्या करून अधिकारीवर्ग हा आकडा कृत्रिम रीतीने कमी दाखवत आहे.

जून १९७४ पर्यन्त नोकरी शोधणाऱ्या सुशिक्षितांची संख्या ५ लाखांनी वाढून ४० लाख ३२ हजारावर गेली. सुशिक्षित बेकारांत नवी भर पडली ती मुख्यतः पुढील राज्यात–बिहार (१ लाख २७ हजार) प. बंगाल (७० हजार), तामिलनाडु (६० हजार), आणि महाराष्ट्र (५० हजार).

ग्रामीण बेकारीसंबंधी अग्रगण्य अर्थशास्त्रज्ञांनी अंदाज केले आहेत, त्यानुसार अर्धबेकार पकडून ग्रामीण भागांतही बेरोजगार लोकांची संख्या आता ४ कोटी भरेल. म्हणजे भारतांतली एकूण बेकारी (अर्ध–बेकार धरून) ५ कोटीवर जाऊ शकेल; १९७१ च्या जनगणनेप्रमाणे देशांत काम करण्यालायक लोक १८ कोटी ३६ लक्ष आहेत. म्हणजे त्यापैकी २५ टक्के लोक रोजगारावाचून वणवण फिरत आहेत. हा समाजव्यवस्थेच्या विघटनाचा प्रश्न आहे, बेकारीचा प्रासंगिक प्रश्न नव्हे.

झाले आहे. ह्या प्रश्नाच्या बाबतीत सरकारची वृत्ति किती बेपर्वाईची आहे हेही त्यावरून दिसून आले आहे.

सरकारी आकडे हे दाखवायला पुरे आहेत. लोकसभेपुढे जे अधिकृत आकडे ठेवण्यात आले त्यावरून कळले की सरकारने ५ लक्ष नोकऱ्यांचे लक्ष गाठण्याची जेथे जाहिरात केली होती तेथे त्याच्या पांचव्या हिश्श्याएवढेही प्रत्यक्षात झाले नाही. नियोजित खर्च ७० कोटी रु. होता, खर्च केला तो त्याच्या निम्मा आणि त्यांतून नोकऱ्या उपलब्ध झाल्या त्या पाच लाखाऐवजी फक्त ९२००० ! बेकारी निवारणाऱ्या आणखी एका योजनेखाली ६८१५९ लोकांसाठी रोजगार निर्माण झाल्याचा वेगळा अंदाज आहे. सुशिक्षित बेकारांची संख्या ४० लाख आहे. ग्रामीण भागात कोटयवधि बेकार आहेत. रोजगारनिर्मितीचे वरील आकडे त्या संस्थांशी ताडून पहा !

ओरिसाच्या ग्रामीण रोजगार हमी योजनेचा हिशेब तपासणीचा अहवाल यावर आणखी प्रकाश पडतो. ह्या योजनेच्या कारभारात भ्रष्टाचार, फसवाफसवी, हिशेबाची अफरातफर आणि सार्वजनिक पैशाचा नंगा अपहार या सर्व गोष्टी असल्याचे त्याने चवाठ्यावर आणले आहे. ही योजना १९७१–७२ आणि १९७२–७३ या दोन वर्षासाठी होती. तिच्यावर ३ कोटी रु. खर्च व्हायचे होते आणि त्यामधून प्रत्येक जिल्हयांत वर्षातून १० महिने निदान १००० लोकांना ३ वर्षे रोजगार मिळत राहील असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात रोजगार मिळाला थोडेच दिवस. मग तपासणीत काय आढळले ?

पूर्ण झाली म्हणून रिपोर्ट झालेली कामे अर्धवटच राहिली होती. आलेले पैसे उधळून संपले म्हणजे काम पूर्ण झाले असा रिपोर्ट जात असे. झालेले काम रिपोर्टच्या मानाने अल्प असे आणि निधीचा उपयोग ठरल्या कामासाठी होत नसे. मस्टरवर मजूरांची नावेच नसत. नाव असे फक्त कंत्राटदाराचे आणि मजुरांची फक्त संख्या. तेव्हा पैसे कोणाच्या खिशात गेले हे उघड आहे.

जवळजवळ सर्वच राज्यांत हीच कर्मकथा आढळते आणि ग्रामीण रोजगार निर्मितीच्या योजनांचा कारभार याच पद्धतीने सर्वत्र चालतो.

तरीसुद्धा ग्रामीण जमीनदार आणि कॉंग्रेसची सरकारे असल्या योजनांचा भडक प्रचार करतात आणि जनतेची सहानुभूतिही थोडीबहुत मिळवतात. शहराविरुद्ध खेडे असा झगडा लावून द्यायचा, एका बाजूला शहरांतले कामगार आणि अन्य श्रमिक आणि दुसऱ्या बाजूला दलित शेतमजूर-शेतकरी या दोहोंत वैमनस्य निर्माण करायचे, हा त्यांचा आवडता उद्योग आहे.

महाराष्ट्रात ट्रेड युनियन चळवळीने शेतकऱ्यांकडे जे दुर्लक्ष केले आहे त्याचा फायदा उठवून काँग्रेस सरकारने रोजगार हमी योजना जाहीर केली आणि त्याचा मुख्य भार टाकला आहे शहरातील कामगारांच्या आणि मध्यम वर्गाच्या विभागांवर. सारी लाजलज्जा गुंडाळून ह्या सरकारने सालीना रु. ३६००० उत्पन्नापर्यंतच्या बड्या भांडवलदारी शेतकऱ्यांना आणि जमीनदारांना आपल्या करांतून वगळले आहे. पण इन्कम–टॅक्स भरणाऱ्या शहरामधल्या कारकुनाला मात्र त्याने करपात्र ठरवले आहे! इन्कम-टॅक्स न भरणाऱ्या सर्वांचीच ह्या करांतून सुटका झाली आहे असे नाही, कारण हा नवा व्यवसाय कर सुरू होतो तो दरमहा ४०० रु. घेणाऱ्या पगारदारांपासून.

वर्गीय कल स्पष्ट आहे. जमीनदारी हितसंबंधीयांचा भरणा असलेल्या मंत्रि-मंडळाने याची दक्षता घेतली की श्रीमंत शेतकरी, भांडवलदार आणि जमिनदार यांना जवळजवळ काहीच द्यावे लागू नये. वास्तविक त्या लोकांवर कसलाच इन्कम-टॅक्स नाही. शेतीवर जे १५०० कोटी रु. खर्च झाले त्याचा बहुतांश फायदा याच लोकांनी लाटलेला आहे. आणि तरीही ते मोकळेच आहेत. शहरांतले उद्योगपति आणि मक्तेदार यांच्यावरही विशेष भार टाकलेला नाही. म्हणजे खेड्यांतील दारिद्र्याला आणि बेकारीला ज्या दोन संस्था खरोखर कारणीभूत आहेत त्यांनाच सहीसलामत सोडून दिलेले आहे. कष्टकऱ्यांना आपसात झुंजू द्या– हे काँग्रेसच्या भांडवलदार–जमिनदारी टोळक्याचे धोरण.

शहरातील कष्टकरी जनतेवर नवी ओझी टाकण्याच्या ह्या कारवाईचा सी. आय. टी. यू. ने निषेध केला पाहिजे. पण ट्रेड युनियन्सनी आणि कामगार-वर्गाने एक गोष्ट समजून घेतली पाहिजे. ग्रामीण जनतेची सहानुभूति आणि पाठिंबा असल्याशिवाय प्रभावी लढा देता येणार नाही. आपण ग्रामीण जनतेकडे दुर्लक्ष केले म्हणून आज आपल्यावर असा हल्ला चढवण्याची सरकारची हिम्मत होत आहे. आत्म-केन्द्रित आर्थिकवादाची ही किंमत होय. आपल्या प्रचारात आपण ग्रामीण जनतेला स्पष्ट करून सांगितले पाहिजे. तिला मदत झालीच पाहिजे आणि तिला लुबाडणाऱ्या ग्रामीण शोषकांकडून पैसा वसूल करून तिला ती मदत मिळाली पाहिजे या मताचे आम्ही आहोत. ह्या नव्या रोजगार हमी योजनेच्या नावाने उभा होणारा पैसा हा शेवटी येत्या निवडणुकीत ग्रामीण श्रीमंताना निवडणूक फंड म्हणून केवळ उपयोगी पडणार आहे आणि जनतेची नेहमीप्रमाणे फसवणूकच होणार आहे यांत मुळीच शंका नाही.

परंतु आज जी परिस्थिति आपल्यासमोर आहे आणि जिला आपल्याला यापुढे तोंड द्यावे लागणार आहे ती, आजवर जिची आपल्याला सवय झाली होती त्या परिस्थितीहून फार वेगळी आहे. आपल्या पगाराचे आणि राहणीमानाचे रक्षण करण्याचा प्रश्न आता अतिशय महत्वाच्या राजकीय प्रश्नांशी आणि राजकीय घडामोडींशी निगडीत झालेला आहे. ज्या राजकीय घडामोडी आज देशाला हालवून सोडीत आहेत, पिळवणूक करणारे वर्ग आज जे निरनिराळे पवित्रे टाकत आहेत त्या सर्वांचा आता आपल्या दैनंदिन लढ्यांवर सरळ परिणाम होऊ लागला आहे आणि ही गोष्ट जर आपल्या नजरेआड झाली तर आपल्याला संपूर्ण हार खावी लागेल.

वेतन गोठवणूक कायद्याचे राजकीय महत्व काय आहे? हा काय चटकन मागे घ्यावा आणि विसरून जावा असा एक प्रासंगिक कायदा आहे? ह्या कायद्याच्या मागोमाग ज्यूट कामगारांचा महागाई भत्ता ठरवून देणारा हुकूम निघाला आणि तो भारत संरक्षण नियमांखाली निघाला. पगार किंवा महागाई भत्ता ठरवण्यासाठी, तो अंशतः किंवा पूर्णतया कापून घेण्यासाठी, दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सरकारच्या मर्जीनुसार कामगारांच्या कमाईवर कमीअधिक घाला घालण्यासाठी कायद्याचा किंवा शासकीय हुकमाचा वापर करणे ही सर्वस्वी नवीन गोष्ट आहे. ट्रेड युनियन वादाचा आणि सामुदायिक सौद्याचा अंत करण्याची, कामगारवर्गाचा वर्गलढा दडपून टाकण्याची ही सुरुवात होय. हे धोरण म्हणजे कामगारांचे पगार पोलिसी दंडुक्याने ठरवण्याचे धोरण. ट्रेड युनियन चळवळीवर नंगी अधिकारशाही गाजवण्याची ती सुरुवात होय.

सामुदायिक सौद्याच्या आणि लढ्याच्या हक्कावर गदा यायला अगोदरच सुरुवात झाली होती. इंडियन एअर लाइन्सच्या संपात याची प्रचीती आली होती. एअर इंडियाच्या संपात ट्रेड युनियन संघटनाच बरखास्त करण्याची उघड मागणी करण्यात आली तेव्हाही याचा प्रत्यय येऊन गेला होता.

वेतन गोठवणूक कायदा हा तसा ओबडधोबडच उपाय आहे. लवकरच त्याची जागा राष्ट्रीय वेतन नीती घेणार आहे. त्या कायद्याने पगारासंबंधीच्या सर्व मागण्या सरकारने नेमलेल्या एका अधिकारी मंडळाकडे सुपूर्द होणार आहेत.

हे राष्ट्रीय वेतन आयोग कामगारांना न्याय देण्याऐवजी त्यांचे पगार नियंत्रित ठेवण्यासाठी पहारा देण्याचे काम करील ही गोष्ट इंटकचे सरचिटणीस रामानुजम महाशयांनीच स्पष्ट करून टाकली आहे. ते म्हणतात, "औद्योगिक घटक आणि उद्योग यामधील वेतनासंबंधीचे सर्व समझोते आणि निवाडे, तसेच कामगारांना अधिक वेतनाची हमी देणारे सर्व करार प्रथम अशा राष्ट्रीय वेतन/

## कामगारांचा प्रतिकार

कॉम्रेडस्, १९६६ उजाडल्यापासून जी दहा वर्षे लोटली आहेत त्यांतल्या प्रत्येक वर्षात १५ लाखाहून अधिक कामगार संपलढचांत उतरत आले आहेत. आर्थिक दुःस्थितिविरुद्ध, काँग्रेस राजवटीच्या दुष्कर्मांविरुद्ध एवढचा सातत्याने भारतीय जनतेचा दुसरा कोणताही विभाग लढलेला नाही.

कॉम्रेडस्, गेली तीन वर्षे ही अखंड लढचाची वर्षे गेली आहेत. १९७२ साली संपात आणि टाळेबंदीत वाया गेलेल्या माणूस-दिवसांची संख्या २ कोटी ५ लाख होती, १९७३ साली ती २ कोटी ६ लाख झाली आणि १९७४ साली, म्हणजे रेल्वे कामगारांच्या झुंजार लढचाच्या वेळी ती ३ कोटी १२ लाख भरली! त्यात रेल्वे कामगारांचा वाटा होता ४५ लाख दिवसांचा.

राहणीमानावर सतत होणारे हल्ले, बेसुमार भाववाढ, राहणीमानाच्या निर्देशांकातल्या लांडचालबडचा, आणि या ना त्या टंचाईने पछाडलेल्या बाजारपेठेतील खुली लूट—या सर्वाला कामगारवर्गाने उत्तर दिले ते प्रतिकार वाढवून आणि तोच वाढता प्रतिकार वरील आकडे दर्शवित आहेत.

रेल्वे कामगार, केंद्र आणि राज्य सरकारांचे कर्मचारी, आयुर्विमा महामंडळाचे व इतर कर्मचारी, प. बंगालचे शूर ज्यूट कामगार, तामिळनाडु, मुंबई आणि दिल्लीचे कापड कामगार, राणीगंज आणि धनबादचे शूर खाण कामगार, दुर्गापुरचे कामगार, केरळचे मळचाचे आणि औद्योगिक कामगार, भरतपुर, कोटा आणि जयपुरचे कामगार—सर्वांनी ह्या महान लढाईत मोलाची कामगिरी बजावली आहे. कॉम्रेडस, पोलिसी छळ, सूडबुद्धीची बडतर्फी, गुंडांचे अत्याचार आणि भाडोत्री मारेकऱ्यांचे हल्ले—या साऱ्यांविरुद्ध धैर्याने दिलेल्या लढचाची शौर्यगाथा त्या संपांच्या पाठीशी आहे. ह्या लढचात अनेकांनी प्राणांची आहुति दिली आहे.

हल्ला मागे हटवायला आणि कधीकधी उद्दिष्टाच्या दिशेने पुढे सरायलादेखील ह्या लढचांची आपल्याला पुष्कळ वेळा मदत झाली. अरिष्ट असूनसुद्धा पुष्कळ विभागांनी महत्वाचे विजय मिळवले आणि युनियन संघटनेचे कार्य पुढे नेले आहे.

कॉम्रेडस्, तरीसुद्धा एकंदरीत भाववाढीमुळे आपले खरे पगार बरेच खाली गेले आहेत. अगदी सरकारी आकडे घेतले तरीसुद्धा १९६१ ते १९७१ या दशकांत खऱ्या पगारात वाढ अशी जवळजवळ झालीच नव्हती. संपांच्या वाढत्या लाटेने मुख्यतः काय केले तर मधल्या वर्षात जी घट झाली होती ती भरून काढण्याचा प्रयत्न केला. असंघटित उद्योगांतील कामगारांचे पगार तर निदान ३० टक्क्यांनी घसरले असावेत.

आहोत असा दावा करून लोकांच्या डोळयांत धूळ फेकण्याची एक युक्ती आहे. ग्रामीण भागांतील लोकांचे आणि असंघटित धंद्यातील कामगारांचे उत्पन्न किती तुटपुंजे आहे याचे एकीकडे वर्णन करायचे आणि उलट दुसरीकडे संघटित धंद्यातील कामगार जणू एक समाजांतला एका लाडका वर्ग बनून गेला आहे असे चित्र रेखाटायचे. मग ह्या फाजील लाड झालेल्या कामगारांची कमाई कमी करून ती देशांतल्या सर्वांत दरिद्री कमाईच्या लोकांच्या पातळीवर आणून ठेवली पाहिजे, ही आतां सवंग झालेली भाषा या रिपोर्टात भरपूर पेरलेली आहे.

तफावती कमी करण्यासाठी कमी पगाराच्या कामगारांचे पगार वाढवावेत असे हे भोंदू विद्वान चुकूनदेखील म्हणत नाहीत. ते फक्त आहेत त्या पातळी खाली आणण्याच्याच गोष्टी करतात.

वेतनाची शास्त्रशुद्ध पध्दति अवश्य स्वीकारावी, पण ती गरजेवर आधारलेल्या किमान वेतनाच्या आधारेच तयार करतां येईल. सगळयाच ठिकाणी एवढे देणे आज शक्य नसेल तर किमान पातळी गांठण्यासाठी तेथे कांही ठराविक मुदत घालून देता येईल. ह्या किमान वेतनाचा पाया स्वीकारला तर मग कुशलता वगैरे गोष्टींवर आधारलेल्या तफावतीविषयी काही फलदायी चर्चा होऊ शकेल. पण त्याचा अर्थ हा होईल की, भांडवलदारांचे नफे समाजाच्या आधीन असले पाहिजेत.

आपल्या दरिद्री लोकसंख्येच्या अगदी तळच्या ३० टक्के लोकांना न्याय देण्याच्या नावाने शास्त्रशुध्द राष्ट्रीय वेतन नीतीचा हा शोध सुरु झाला होता. पांचव्या योजनेचे ते महान घोषवाक्य तुम्हाला आठवत असेलच. हल्ली त्या अभागी ३० टक्के लोकांची स्थिती सुधारण्याच्या गोष्टी फारशा ऐकू येत नाहीत आणि अरिष्ट व योजना–सुट्टीचे पहिले बळी तेच झाले आहेत. आता काही उरले असेल तर ती इतर विभागांवर हल्ला करण्याची कारवाई.

## नवे औद्योगिक संबंध विधेयक

हुकुमशाहीच्या शस्त्रागारांत भर घालण्यासाठी तिसऱ्या एका शस्त्राला धार लावली जात आहे. ते शस्त्र म्हणजे नवे औद्योगिक संबंध विधेयक. संपावर जवळजवळ पूर्ण बंदी घालायची आणि कामगारांवर सक्तीचा लवाद लादायचा हा या विधेयकाचा हेतू. पण तेवढेच नाही. संपावर नियंत्रण किंवा बंदी घालण्यापेक्षाहि अधिक कांहीतरी त्यांत आहे.

मालकांशी होणाऱ्या वाटाघाटीत कामगारांचे प्रतिनिधित्व कोणी करायचे, याची निवड करण्यासाठी नियम घालून देण्याशी, म्हणजे ट्रेड युनियन मान्यतेच्या

उत्पन्न आयुक्तापुढे गेले पाहिजेत आणि त्याच्याकडून संमति मिळाल्यानंतरच ते पक्के झाले पाहिजेत. आयुक्ताचे कार्य देखरेखीचे तसेच दुरुस्तीचे असे दोन्ही प्रकारचे राहील, म्हणजे उघडउघड एकाच प्रकारचे काम करणाऱ्या कामगारांच्या पगारांत असमर्थनीय अशी तफावत असेल तर ती आणि कुठे भरमसाट जास्त पगार असतील तर ते कमी करतां येतील." भर आहे तो पगार नियंत्रित आणि कमी करण्यावर; संपफोडया दलाल मालकाच्या मनची गोष्ट कशी स्वच्छ बोलून दाखवतो ?

नव्या धोरणाला नाव आहे "उत्पन्न आणि वेतन नीति." पण सर्वच भांडवलदारी देशांत जो अनुभव येऊन गेला आहे तोच येथे येणार आणि हे धोरण केवळ वेतन–नियंत्रणाचे धोरण बनून रहाणार. राष्ट्रीय उत्पन्न, ऊनाधिक भेद वगैरे शब्द वापरून त्याला बारीकसा शास्त्रीय मुलामा चढवण्याचाहि प्रयत्न चालू आहे. ह्या धोरणान्वये उद्योगधंद्यातील किमान वेतन दरमहा रु. २०० हून अधिक असणार नाही. एवढे किमान वेतन ठरवून झाले म्हणजे सरकारच्या मते स्वतःची जबाबदारी पार पाडून झाली. पुढे कांही वाढ मिळायची की नाही हे अनेक गोष्टींवर अवलंबून राहील. अशा गोष्टी म्हणजे एक राष्ट्रीय उत्पन्नाची परिस्थिती, दुसरी म्हणजे संघटना करून स्वतःचे रक्षण करण्यास असमर्थ असलेल्या कामगारांचे वेतन, वगैरे. कामगारांच्या गरजा काय, त्या उद्योगातले नफे केवढे, कामगारांच्या कामाचा दर्जा कोणता यापैकी कुठलीच गोष्ट निर्णय घ्यायला उपयोगी पडणार नाही. राहणीखर्चात होणाऱ्या वाढीबद्दल पूर्ण भरपाई मिळावी हे तत्त्व मानले जाणार नाही. बहुसंख्य कामगारांना या तत्त्वाचा लाभ देण्यास ठाम नकार दिला जाईल आणि सरकारच्या चलनवाढीच्या धोरणाचा पुरा मार त्यांना खावा लागेल. पगाराचे उत्पन्न उत्पादन-क्षमतेशी जोडलेले हवे हे निमित्त दाखवून बारीकशी वाढ देण्यापूर्वी कामगारांची पिळवणूक अत्यंत तीव्र करून ठेवण्याची काळजी घेतली जाईल. हे सर्व कशाच्या नावाखाली ? तर विषमता कमी करण्याच्या नावाखाली ? जणू आजच्या समाजा-तली मूलभूत विषमता कुठली असेल तर ती कामगार–कामगारांच्या कमाईमधील तफावतीची, वर्गाच्या कमाईतील अफाट अफावतीची नव्हे ! कामगाराचे वेतन आणि टाटा–बिर्लांच्या मक्तेदारी नफ्यांतील तफावतीची नव्हे ?

ह्या तथाकथित वेतन–नीतीचा आधार आहे, सुखमय चक्रवर्तींचा रिपोर्ट. हा रिपोर्ट म्हणजे कामगारांच्या भिन्नभिन्न विभागांत फूट पाडण्याचे एक साधन आहे आणि पगार ठरविण्यासाठी आता एक शास्त्रशुद्ध पद्धति आपण स्वीकारणार

प्रश्नाशी या विधेयकाचा मुख्यत्वेकरून संबंध आहे. वाटाघाटींमध्ये प्रतिनिधी कोण याबाबत वाद आल्यास निवड करण्याचा साधा लोकशाही उपाय म्हणजे कामगारांचे मतदान घेणे. परंतु ह्या भोंदू लोकशाहीवाद्यांना, सरकार चालवणाऱ्यांना आणि इंटक–आयटकमधल्या त्यांच्या होयबा पुढाऱ्यांना ही साधी गोष्ट सुचत नाही. खरे म्हणजे नेमकी तीच गोष्ट त्यांना टाळावयाची आहे आणि आपल्या चमचांना मान्यताप्राप्त युनियनचा दर्जा मिळवून देण्याची खटपट करायची आहे.

मालक मंडळी आणि श्रीमती गांधीसकट सारा केन्द्रीय मंत्रीगण एकाच उद्योगांत युनियन्स फार होत असल्याचे जे प्रचारी फुगे सोडून देत आहेत ते याचाच पाया घालण्यासाठी. हे लोक असे ध्वनित करतात की संप वाढत चालले आहेत ते कामगारांची परिस्थिती खालावल्यामुळे नव्हे तर अनेक युनियन्सच्या अस्तित्वामुळे. त्यांच्या मते कामगार म्हणजे मुकी बिचारी कुणी हाका अशी मेंढरे आहेत, कांही तक्रार नसतांना महिने न् महिने उगाच हालअपेष्टा सोसायला ती तयारच असतात ! तेव्हा कामगारांचे प्रतिनिधित्व करण्याचा एकमेव हक्क एकाच युनियनला दिला पाहिजे, त्याशिवाय वाटाघाटी यशस्वी होणारच नाहीत. हा त्यांचा ढोंगी युक्तिवाद आहे. एकाएका उद्योगांत अनेक युनियन्स झाल्याबद्दल सरकारला खरोखरच चिंता वाटते का ? तसे असेल तर सर्वप्रथम सरकारने स्वतःचा निषेध करावा, स्वतः स्वीकारलेल्या धोरणाचा निषेध करावा आणि भांडवलदार वर्गाचा निषेध करावा. लढणाऱ्या युनियन्सना दडपून टाकायचे आणि भ्रष्ट पुढाऱ्यांना आणि संघटनांना हाताशी धरायचे हे सतत चालले नसते तर युनियन्स फार झाल्याची तक्रार करण्याची वेळच आली नसती. परंतु मान्यता बहाल करून आपल्या पंख्याखालच्या युनियन्सना उत्तेजन देण्याचे पध्दतशीर धोरण सत्ताधारी पक्षाने कधीपासून चालविले आहे. आज युनियन्स अनेक आहेत याचे मुख्य कारण काँग्रेस पक्षाचे हे धोरण आणि खऱ्याखुऱ्या लढाऊ युनियन्सना मान्यता देण्यास त्याचा कट्टर विरोध. अशा परिस्थितीत युनियन्स उदंड झाल्याबद्दलच्या प्रचाराचा हेतू एकच असू शकतो, तो हा की ट्रेड युनियन्स चालवण्याचा एकमेव मक्ता काँग्रेसला आणि बाकी सर्वांवर बंदी घालणे.

कॉम्रेडस्, नव्या संकल्पित कायद्याचा मुख्य हेतू हा आहे. हा सैतानी कावा आहे. एकच युनियन हवी, एकच प्रतिनिधी हवा ही पंतप्रधानांच्या तोंडची भाषा म्हणजे देशात एकच राजकीय पक्ष हवा ह्या घोषणेपासून एकच पाऊल मागे असलेली भाषा आहे. मुजिबूर रहमान यांच्या एकपक्षीय हुकुमशाही प्रस्थापनेचे अनुकरण करण्याची ती पूर्वतयारी आहे. मुजिब साहेबांच्या त्या कृत्याचा आमच्या पंतप्रधानांनी गौरव केला तो उगाच नव्हे.

आमच्या सी. आय. टी. यू. च्या युनियन्स आणि आमचे मित्र या बाबतींत अजून गाफीलच आहेत. इंटक आणि आयटकच्या संधिसाधु पुढाऱ्यांशी संगनमत करून सरकार गुप्तपणे त्यांच्याकरता हा जो खड्डा खणत आहे त्याची त्यांना जाणीव झालेली आहे असे म्हणता येत नाही. कामगारवर्गाचा हा जो घोर विश्वासघात करण्यात आयटकचे पुढारी गुंतले आहेत त्याचा आंतरराष्ट्रीय प्रमाणावर धिःकार केला पाहिजे. जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनमध्ये फ्रान्स आणि इटलीच्या लढाऊ कामगार संघटना आहेत, समाजवादी देशांच्या संघटना आहेत आणि तरी अशा फेडरेशनने भारतातील आपल्या संलग्न संस्थेला ट्रेड युनियन चळवळीचा गळा कापण्याचे काम करू द्यावे आणि भांडवलदार–जमीनदार वर्गाशी हातमिळवणी करू द्यावी यापरती लाजिरवाणी आणि घृणास्पद गोष्ट कोणती ?

कॉम्रेडस, युनियन–युनियनमधल्या मतभेदांमुळे तंटे उद्भवलेले दिसतात असे कांही प्रसंगी घडते हे आपण म्हटले आहे. पण साधारणपणे असे केव्हा घडते ! जेव्हा सरकार आणि मॅनेजमेन्ट कामगारांना अंधारांत ठेऊन लाचार युनियन पुढाऱ्यांबरोबर कामगारविरोधी करार करतात आणि खरोखरच प्रातिनिधिक असलेल्या संघटनांना डावलतात तेव्हा असे घडते. शिवाय अलीकडे एकजुटीची प्रवृत्ती वाढत चालली आहे आणि कित्येक प्रसंगी सी. आय.टी. यू., आयटक आणि इंटक, हि. म. सभा, यूटक ह्या सर्वांनी समान मागण्यांसाठी हातमिळवणीदेखील केलेली आहे हे काय अज्ञात आहे ? ह्या सर्व युनियन्स एकजुटीने उभ्या ठाकल्या तेव्हां सरकारच्या किंवा मॅनेजमेन्टच्या वृत्तीत हा फरक पडला कां ? ह्या साऱ्या युनियन्स प. बंगालच्या गेल्या ज्यूटच्या संपात एकत्र आल्या तेव्हा काय घडले हे प्रसिद्ध आहे. प्रथम कामगारांना उपाशी मारण्यासाठी आणि नंतर इंटकला फितूर करून कामगारांची एकजूट फोडण्यासाठीच सरकार आणि मालक एक झाले ना ? रेल्वे संपात १०० हून अधिक रेल्वे युनियन्स एकत्र आल्या होत्या, तेव्हा काय घडले ? रेल्वे संघर्ष समन्वय समितीत आजहि सर्व रेल्वे युनियन्स आहेत. ह्या समितीस सरकार मान्यता का देत नाही ?

कॉम्रेडस्, आपण आपली भूमिका वारंवार स्पष्ट केली आहे. आम्हाला एका उद्योगांत एकच युनियन हवी, पण ती कामगारांनी मुक्तपणे निवडलेली हवी, शोषक वर्गांनी किंवा त्यांच्या सरकारने लादलेली असता कामा नये. जिच्या कमिट्या लोकशाही पध्दतीने निवडलेल्या आहेत आणि जिचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो, अशा एकाच युनियनमध्ये बहुसंख्य कामगारांचा विश्वास बसेपर्यंत आम्ही इतर सर्व खऱ्याखुऱ्या संघटनांशी सहकार्य करीत राहू. युनियन्सना

मान्यता गुप्त मतदानाच्या आधारे मिळावी ही सी. आय. टी.यूची भूमिका आहे आणि पुढाऱ्यांनी केलेल्या सर्व करारांना कामगारांकडून मान्यता मिळणे बंधनकारक असले पाहिजे ही सी. आय. टी. यूची मागणी आहे.

ट्रेड युनियन चळवळीसंबंधीच्या सरकारी धोरणात हुकुमशाही प्रवृत्तीची प्रचंड वाढ होत असलेली आपण गेल्या अधिवेशनापासूनच्या दोन वर्षात पहात आलो आहोत. एक सरकारछाप युनियन, एक सरकारनिश्चित वेतन, संप बंद – ही या नव्या प्रवृत्तीची घोषवाक्ये आहेत. अंमलबजावणीचे हत्यार आहे गुंडांचे टोळके.

देशात जे कांही घडत आहे त्याचेच प्रतिबिंब या प्रवृत्तीत पडले आहे. देशातल्या लोकशाहीची काय स्थिती आहे ?

### राजकीय दडपशाही

ग्रामीण भागांत शेतकरी चळवळ कमजोर आहे आणि शहरांत कामगारवर्गाची राजकीय जाणीव कमजोर आहे; यामुळे लोकशाही चळवळीवर निर्दय दडपशाही करणे आणि लढणाऱ्या जनतेवर वाटेल ते अत्याचार करणे सत्ताधारी पक्षाला शक्य झाले आहे. ट्रेड युनियन चळवळीवर झालेल्या क्रूर दडपशाहीचा मी अगोदरच उल्लेख केला आहे. जनतेचे इतर सर्व विभाग या दडपशाहीत वाटेकरी आहेत. त्यांत विद्यार्थी, शेतमजूर, शिक्षक आणि अस्पृश्य यांचाहि समावेश आहे. लढ्यात त्यांना क्रूरपणे दडपणारे सरकार तुरुंगांत डांबल्यावरहि त्यांना तेवढ्याच क्रौर्याने वागवते. भारतामधील राजबंद्यांना मिळणारी वागणूक हा एक आंतरराष्ट्रीय निंदेचा विषय बनला आहे, आणि चिलीच्या फॅसिस्ट हुकुमशहांच्या कैदेतील सर्व राजबंद्यांच्या मुक्ततेची मागणी करणाऱ्या राष्ट्रसंघातील ठरावाला भारताने मत दिले नाही यात कांही नवल नाही. मारहाण, गोळीबार, शारीरिक छळ – या सर्व गोष्टी एवढ्या थराला गेल्या आहेत कीं, शेवटी सुप्रीम कोर्टालादेखील सरकारला इशारा द्यावा लागला की तुरुंगांतल्या कैद्यांनाही कांही मूलभूत अधिकार आहेत व नोकरशाही ते पायदळी तुडवूं शकत नाही. बिहारमध्ये जबाबदार नेत्यांनी म्हटले की, बिहारच्या कांही तुरुंगात महिला बंदींना जवळजवळ नग्नावस्थेत ठेवण्यात येते, त्यांना तुरुंगाच्या नियमांप्रमाणे द्यायचे कपडेसुद्धा अधिकारीवर्ग देत नाही.

उपासमार, बेसुमार भाववाढ आणि राजकीय दडपशाही व या सर्वांच्या जोडीला चहूंकडे पसरलेला भ्रष्टाचार यांनी ओतप्रोत भरलेल्या या राजवटीविरुद्ध लोक आता लढू लागले आहेत आणि आपल्या गाऱ्हाण्यांची ताबडतोब सोडवणूक व्हावी अशी मागणी उठवू लागले आहेत.

केरळमध्ये अच्युत मेनन मंत्रिमंडळाच्या जनताविरोधी धोरणाविरुद्ध प्रचंड चळवळ चालली आहे. आपली सीआयटीयूदेखील त्यात महत्वाचा भाग घेत आहे. ही चळवळ वाढत्या निषेध–निदर्शनांचाच एक भाग आहे. ह्या चळवळीविरुद्ध काँग्रेस-उजवे कम्युनिस्ट मंत्रिमंडळाने अभूतपूर्व दडपशाही चालवली आहे. हजारोंची धरपकड' शेकडोंना मारहाण, पोलीस कोठडीत स्त्रियांवर बलात्कार, सर्व प्रकार चालले आहेत. मंत्रिमंडळाच्या भाडोत्री गुंडांनी सी.आय.टी.यू.च्या आणि इतर लोकशाहीवादी संघटनांच्या १३० हून अधिक कार्यकर्त्यांचे केरळमध्ये निर्घृणपणे खून केले आहेत. मंत्रिमंडळाने राजिनामा द्यावा आणि विधानसभा विसर्जित करावी अशी मागणी लोक करीत आहेत.

भ्रष्टाचार बंद करा, सर्व राजबंद्यांची सुटका करा, निवडणूक पद्धतीत सुधारणा करा, मिसा, आणीबाणी आणि भारत संरक्षण कायदा रद्द करा, या मागण्यांसाठी बिहारमध्ये चळवळ चालू आहे, तीहि या संतप्त निषेधाचाच एक भाग आहे. कित्येक राज्यांत तशी चळवळ उभारण्याच्या प्रयत्नांत लोक गुंतलेले आहेत. निवडणूक पद्धतीत सुधारणा करण्याची मागणी अग्रभागी आली याचे कारण काँग्रेस राजवटीत भांडवलदारी लोकशाही किती कमालीची भ्रष्ट झाली आहे हे लोकांपुढे उघड होत चालले आहे. तुम्हाला माहितच आहे, कीं, बंगालमधल्या निवडणुका पूर्णपणे बनावट होत्या आणि प्रतिनिधी निवडून देण्याच्या लोकांच्या अधिकाराची तशीच वासलात लावण्याचा प्रयत्न पुढील निवडणुकीत आणखी कांही राज्यात होण्याचा संभव आहे. बिहारमध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली उठलेल्या या न्याय्य मागण्यांना सरकारने जोराची दडपशाही करून उत्तर दिले आहे. हजारोंची धरपकड झाली आहे, अनेक लोक गोळीबारात ठार झाले आहेत. राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना बिहारमधून हद्दपार करण्यात आले आहे, चळवळीच्या पुढाऱ्यांना तुरुंगात डांबण्यात आले आहे, साऱ्या राज्यात दहशतशाहीचे थैमान चालू आहे.

ह्या चळवळीला जनसंघासारखे प्रतिगामी पक्ष जोडलेले आहेत. त्यामुळे सरकार आणि सरकारचे दोस्त उजवे कम्युनिस्ट यांना खाद्य मिळते एवढेच नव्हे तर लोकांच्या मनातहि गोंधळ होतो. प्रतिगाम्यांचा हा समावेश लोकशाही चळवळीच्या प्रगतीला धोका निर्माण करतो. कारण जमीनदार – भांडवलदारी शोषणाविरुद्धच्या लढ्याला आणि लोकशाहीला ज्यांचा उघड विरोध आहे त्यांचेच वर्चस्व वाढले आणि तेच जर काँग्रेसच्या जागी निवडून आले तर चळवळीचे मूळ उद्दिष्टच खच्ची होईल. ट्रेड युनियन चळवळ आणि कामगार चळवळ हा धोका

केव्हाही दृष्टीआड करू शकत नाहीत. त्याविरुद्ध स्वतः दक्षता बाळगणे व लोकांना सावध करणे हे त्यांचे कर्तव्यच आहे. त्याचबरोबर लोकशाही मागण्यांच्या मागे आपली ताकद उभी करणे आणि त्यांना पाठिंबा देणे हेहि संघटित ट्रेड युनियन चळवळीचे कर्तव्य आहे.

कॉम्रेडस्, आपल्या स्वातंत्र्यावरील वाढत्या हल्ल्यांना कामगारवर्ग आणि ट्रेड युनियन चळवळ दीर्घ काळ तोंड देत आली आहेत. प. बंगालच्या कांही भागात तर नागरीक स्वातंत्र्याचा मागमूसहि राहिला नसून त्या राज्यातील आपल्या चळवळीला चक्क निम–फॅसिस्ट दहशतबाजीचा सामना करावा लागत आहे. अलिकडे दुरुस्तीवादी सहकारी मदतीस घेऊन काँग्रेसच्या गुंडांनी चढवलेल्या हल्ल्यास तोंड देण्याची पाळी श्री जयप्रकाश नारायण यांजवरहि आली होती. सर्व लोकशाहीवादी संघटना नागरीक स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ जर यावेळी एकवटल्या नाहीत तर काँग्रेस सरकार ह्या स्वातंत्र्याची राखरांगोळी करायला फारसा वेळ लागणार नाही हे स्पष्ट दिसते आहे. तेव्हा नागरीक स्वातंत्र्याचा लढा संघटित करण्याच्या कामीदेखील सी.आय.टी.यू.ने आणि तिच्या युनियन्सनी पुढाकार घेतला पाहिजे.

सी.आय.टी.यू.च्या युनियन्स सर्व लोकशाहीवादी मागण्यांना आणि चळवळींना अवश्य पाठिंबा देतील. पण त्या हे कदापि विसरू शकत नाहीत कीं, केवळ डाव्या आणि लोकशाहीवादी शक्तींची वाढती एकजूटच काँग्रेसच्या जुलमी सत्तेचा पाडाव करूं शकेल. आमचे सारे प्रयत्न या दिशेनेच केन्द्रित होतील.

हे करावयाचे तर आपण कामगारवर्गाला आज भेडसावणाऱ्या भयानक आर्थिक परिस्थितीशी चिकाटीने टक्कर दिली पाहिजे. कारखाने बंद पडणे, नोकऱ्या जाणे आणि पगारकपात होणे या साऱ्या गोष्टी या परिस्थितीत अभिप्रेत आहेत.

हे संकट आज समग्र कामगारवर्गासमोर आणि सर्व कर्मचाऱ्यांसमोर 'आ' वासून उभे आहे. त्यापासून शेतमजूर, गरीब शेतकरी, कष्टकऱ्यांचे इतर विभाग, सर्वांनाच धोका आहे. त्या संकटाला जबाबदार आहेत सरकारची भांडवलदारी–जमीनदारी धोरणे. ही धोरणे देशी–परदेशी मक्तेदारांचे आणि जमीनदारांचे नफे उचलून धरतात आणि कामगारांच्या व इतर श्रमिकांच्या कमाईवर हल्ले चढवतात.

शत्रूची ही चढाई वेतनगोठवणुकीपेक्षाहि जास्त सर्वव्यापी आणि अपायकारक आहे. तिचा प्रतिकार करण्यासाठी एक होण्याची हाक सी.आय.टी.यु. सर्व कामगारवर्गाला आणि सर्व ट्रेड युनियन्सना देत आहे. कामगार – कर्मचाऱ्यांनी दिल्ली परिषदेत अभूतपूर्व एकजूट करून दाखविली आणि नंतरच्या परिषदांत, विशेषतः

संपात आणि बंदमध्ये ही लढाई आणखी पुढे नेली. आगामी हल्ले परतवण्यासाठी लढ्यामधली ही एकजूट आणखी भक्कम केली पाहिजे. बेकारीच्या वाढत्या संकटाविरुद्ध कामगारांनी एकजुटीने रोजगाराच्या हक्काच्या आणि बेकारभत्त्याच्या मागण्या उठवल्या पाहिजेत. भाववाढ आणि वेतन–गोठवणूक यांविरुद्ध त्यांनी पुन्हा आवाज उठवला पाहिजे आणि नफ्यात घसघशीत कपात करा, मक्तेदारी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करा, जमीनदारांचे धान्यसाठे ताब्यात घ्या आणि ते लोकांना त्यांच्या आटोक्यातल्या वाजवी भावात वाटून टाका– ह्या मागण्या त्यांनी उठवल्या पाहिजेत. गरजांवर आधारलेल्या वेतनाची मागणी करताना त्याचवेळीं त्यांनी शेतमजुरांची स्थिती सुधारा, शेतकऱ्याला त्याच्या मालाची रास्त किंमत द्या आणि मक्तेदार, बडे भांडवलदार आणि जमीनदार यांच्यावरील करात घसघशीत वाढ करा याहि मागण्या पुढे रेटल्या पाहिजेत. काळा बाजार नष्ट करा आणि काळ्या बाजारात कमावलेली सर्व संपत्ति जप्त करा अशी मागणी त्यांनी केली पाहिजे.

देशांतील भांडवलदार व जमीनदार कामगारांना आणि जनतेला अरिष्टाला बळी देऊ पहात आहेत, तर सत्ताधारी पक्ष देशात एकपक्षीय हुकूमशाही चालू करू पहात आहे. वरील कार्यक्रम हाती घेऊनच कामगारांना त्यांच्या कारवायांचा यशस्वी मुकाबला करता येईल.

---

**छपाई :** –पृथ्वीराज प्रिंटर्स, ६२२।१ भोईवाडा, परळ–मुंबई.

**प्रकाशक** :–पी. के. कुरणे, सेक्रेटरी, स्वागत समिती, ३ री सीआयटीयू परिषद, जनशक्ती, मुंबई १३.

छपाई : प्रथ्वीराज प्रि[illegible]२२, भोईवाडा, परळ मुंबई १२.
प्रकाशक : पी. के. कुरणे, स[illegible]र -रिसेप्शन कमिटी, सी. आय. टी. यू.
जनशक्ती, ग्लोब मिल पॅसेज, वरळी-मुंबई